M52 एम. ए. (अर्थशास्त्र)

COURSE CODE : ECO311
BOOK CODE : ECO3113

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ



सत्र तिसरे

# ECO311
# सार्वजनिक अर्थशास्त्र

# पुस्तक ३ : भारताचे राजकोषीय धोरण आणि केंद्र सरकारचे अंदाजपत्रक

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव
चव्हाण
महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ

**ECO 311**
**सार्वजनिक अर्थशास्त्र**
**Book Code : ECO3113**

पुस्तक ३

# भारताचे राजकोषीय धोरण आणि केंद्र सरकारचे अंदाजपत्रक

**लेखक : डॉ. दत्तात्रय गव्हाणे**


| | |
|---|---|
| घटक १ : राजकोषीय धोरणाची उद्दिष्ट्ये, राजकोषीय धोरण आणि मौद्रीक धोरणातील परस्परावलंबन | १ |
| घटक २ : २०१० पासूनच्या भारतातील अंदाजपत्रकातील प्रवृत्ती-खर्च व महसूल संदर्भात | ७ |
| घटक ३ : भारतातील कर आकारणीचे प्रकार : वस्तू व सेवा कर | १५ |
| घटक ४ : भारतातील सेवा कर आकारणी | २३ |
| घटक ५ : सामाजिक क्षेत्रावरील खर्च | ३२ |
| घटक ६ : अनुदान, सरकारकडून व्याज भरणा | ३८ |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## कुलगुरू : प्रा. संजीव सोनवणे


### मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषद

प्रा. नागार्जुन वाडेकर (अध्यक्ष)
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. हेमंत राजगुरू
सहयोगी प्राध्यापक
शैक्षणिक सेवा विभाग
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. विजया पाटील
सहयोगी प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

माधव पळशीकर
सहयोगी प्राध्यापक
संगणकशास्त्र विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ
नाशिक

डॉ. मोहन काशीकर
प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर

डॉ. सतीश बडवे
सेवानिवृत्त प्राध्यापक
मराठी भाषा आणि साहित्य विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

डॉ. लतिका अजबानी
सहायक प्राध्यापक
वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. ज्योती निसवाडे
प्राध्यापक
मातृ सेवा संघ समाजकार्य महाविद्यालय,
नागपूर

डॉ. सुरेश कानडे
प्राध्यापक व हिंदी विभागप्रमुख
एस.एम.आर.के. महिला महाविद्यालय
नाशिक

डॉ. मधुकर शेवाळे
उप ग्रंथपाल
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. विनायक देशपांडे
प्राध्यापक व माजी विभागप्रमुख
व्यवसाय व्यवस्थापन विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर

### राज्यस्तरीय शिक्षणक्रम सल्लागार समिती (अर्थशास्त्र)

नागार्जुन वाडेकर (अध्यक्ष)
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. धनश्री महाजन
माजी अधिष्ठाता आणि वरिष्ठ प्राध्यापक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

डॉ. सागर कोंडेकर
संचालक, सामाजिकशास्त्र विद्याशाखा
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
उपकेंद्र लातूर, नांदेड

प्रा. धनमंजीरी साठे
मानद प्राध्यापक गोखले राज्यशास्त्र व
अर्थशास्त्र संस्था, पुणे
सेवानिवृत्त प्राध्यापक, सावित्रीबाई फुले
पुणे विद्यापीठ

डॉ. खलील शहा
डेटा मॅनेजर
इन्स्टिट्यूट फॉर सोशल अँड
इकॉनॉनिक चेंज
बंगळूर

डॉ. धीरज कदम
अर्थशास्त्र विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर

प्रा. नीरज हातेकर
मानद प्राध्यापक, अझीम प्रेमजी विद्यापीठ,
बंगळूर, माजी संचालक, अर्थशास्त्र
विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. नरेश बोडके
संचालक
अर्थशास्त्र विभाग, भारतीय प्रतिस्पर्धा
आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली

प्रा. अझर खान
अर्थशास्त्र विभाग, मांघणमळ उधाराम
कॉलेज ऑफ कॉमर्स
पुणे

प्रा. ज्ञानदेव तळूले
माजी प्रमुख आणि वरिष्ठ प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ
कोल्हापूर

डॉ. अमित थोरात
सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
जवाहरलाल नेहरू विद्यापीठ
नवी दिल्ली

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## कुलगुरू : प्रा. संजीव सोनवणे

## संचालक : नागार्जुन वाडेकर, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

## लेखक

डॉ. दत्तात्रय गव्हाणे
म.वि.प्र.स. कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, येवला रोड, मनमाड
ता. नांदगाव, जि. नाशिक

## भाषिक व अनुदेशन संपादन

डॉ. शायिन शेख
शैक्षणिक संयोजक (अर्थशास्त्र)
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे
विद्याशाखा, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

## शिक्षणक्रम संयोजक

डॉ. शायिन शेख
शैक्षणिक संयोजक (अर्थशास्त्र)
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे
विद्याशाखा, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

## निर्मिती

श्री. विलास बधान
प्र. प्रमुख, ग्रंथनिर्मिती केंद्र, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

© २०२४, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

❑ **प्रथम मुद्रण** : जुलै २०२४ ❑ **प्रकाशन क्रमांक** : २८१४
❑ **मुखपृष्ठ रेखाटन** : श्री. नितीन महामुनी
❑ **अक्षरजुळणी** : परफेक्ट कॉम्प्युटर, त्रिमूर्ती चौक, सिडको, नाशिक - ८
❑ **मुद्रक** :
❑ **प्रकाशक** : दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**ISBN 978-81-19791-95-8**

**B23-24-08**

# अर्थशास्त्र पदव्युत्तर पदवी (एम.ए.) शिक्षणक्रम (M52)

## अभ्यासक्रम

## सार्वजनिक अर्थशास्त्र (ECO 311)

**पुस्तक १. सार्वजनिक अर्थशास्त्राचा परिचय**

घटक १ : सार्वजनिक आयव्ययाची ओळख
घटक २ : आर्थिक विकासात सरकारची भूमिका, बेगनरचा राज्य क्रियाकलाप वाढविण्याचा नियम
घटक ३ : सार्वजनिक वस्तू, गुणवत्तेच्या वस्तू, बाह्य तत्त्वे, फुकटेगिरीची समस्या
घटक ४ : बाजार कार्यक्षमता
घटक ५ : बाजारातील अपयश आणि राज्य
घटक ६ : सार्वजनिक खर्च

**पुस्तक २. कर आकारणी**

घटक १ : कर आकारणीची ओळख
घटक २ : सार्वजनिक करांची संकल्पना, सार्वजनिक करांची तत्त्वे आणि भारतीय कर प्रणालीची वैशिष्ट्ये
घटक ३ : कराभार – करारोपण
घटक ४ : कर आकारणी आणि आर्थिक कार्यक्षमता
घटक ५ : तुटीचा अर्थभरणा
घटक ६ : कर चुकवेगिरी, काळा पैसा, कर आकारणी आणि विकसनशील अर्थव्यवस्था

**पुस्तक ३. भारताचे राजकोषीय धोरण आणि केंद्र सरकारचे अंदाजपत्रक**

घटक १ : राजकोषीय धोरणाची उद्दिष्ट्ये, राजकोषीय धोरण आणि मौद्रीक धोरणातील परस्परावलंबन
घटक २ : २०१० पासूनच्या भारतातील अंदाजपत्रकातील प्रवृत्ती–खर्च व महसूल संदर्भात
घटक ३ : भारतातील कर आकारणीचे प्रकार : वस्तू व सेवा कर
घटक ४ : भारतातील सेवा कर आकारणी
घटक ५ : सामाजिक क्षेत्रावरील खर्च
घटक ६ : अनुदान, सरकारकडून व्याज भरणा

**पुस्तक ४. वित्तीय संघराज्यवाद**

घटक १ : राजकोषीय संघवादाचा परिचय
घटक २ : राजकोषीय संघवादाचे सिद्धांत/तत्त्वे
घटक ३ : भारतातील केंद्र–राज्य वित्तीय संबंध
घटक ४ : वित्त आयोग
घटक ५ : राज्य सरकारच्या आयव्ययाची प्रवृत्ती
घटक ६ : भारतातील स्थानिक सरकार

# घटक १ : राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे , राजकोषीय धोरण आणि मौद्रिक धोरणातील परस्परावलंबन

*अनुक्रमणिका*


१.० उद्दिष्टे
१.१ प्रास्ताविक
१.२ विषय-विवेचन

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
१.५ सारांश
१.६ सरावासाठी स्वाध्याय
१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- स्थूल आर्थिक धोरणांची माहिती मिळविणे.
- स्थूल आर्थिक धोरणांचे प्रकार अभ्यासणे

## १.२ प्रास्ताविक

अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गाने वाटचाल करत असतांना ती आपोआप संतुलित होत नाही. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ ज्या निर्हस्तक्षेप नीती (Laissez Fair Policy), पूर्ण रोजगार, पूर्ण स्पर्धा या गृहीतांवर आधारलेले होते त्याची प्रचीती सवर्प्रथम १९२९-३३ च्या जागतिक मंदीने आली. तेव्हापर्यंत स्थूल अर्थशास्त्राचा विकास खुंटीत झाला होता. पण या महामंदीने सनातनवादी विचारसरणीवर कडाडून टीका झाल्या. व महामंदी दूर करण्यासाठी १९३६ मध्ये ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ जॉन मेनार्ड केन्स यांनी The General Theory of Employment Interest Money हा ग्रंथ लिहिला आणि सनातनवादी विचारांची जागा केन्सच्या विचाराने घेतली. त्यानंतर खऱ्या अर्थाने स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासाला गती मिळाली. स्थूल आर्थिक धोरणांची मांडणी करून अर्थव्यवस्थेला एका लक्षित ध्येयापर्यंत घेऊन जाता येते. त्यासाठी सरकारचा हस्तक्षेप असणे अनिवार्य आहे. हे केन्सच्या विचाराने स्पष्ट झाले. आय-व्यय यांची व्यवस्थित व सुसंगत अंमलबजावणी होण्यासाठी दोन प्रकारच्या धोरणांचा वापर प्रामुख्याने केला जातो.

(अ) **चलन विषयक धोरण :** हे देशाच्या मध्यवर्ती बँकेकडून ठरविले जाते. यामध्ये पैसा, त्याची संख्या, पुरवठा, इत्यादी वर नियंत्रण ठेवण्यासाठी धोरण आखले जाते.

(आ) **राजकोषीय धोरण :** मध्यवर्ती सत्तेमार्फत किंवा सरकार मार्फत जी धोरण राबविली जातात त्यांना राजकोषीय धोरणे असे म्हणतात. यात कर, कराचे दर, कराचे प्रकार, खर्च, कर्ज, अनुदाने, इत्यादी बाबत निर्णय घेतले जातात व त्याची अंमलबजावणी करून इच्छित उद्देश साध्य केला जातो.

# १.२ विषय-विवेचन

जागतिक मंदीच्या काळात निर्हस्तक्षेप धोरणाचा त्याग करून सरकारी हस्तक्षेपाचे धोरण स्वीकारले. अनेक देशांनी पोलिसी राज्याच्या संकल्पनेचा त्याग करून कल्याणकारी राज्याची (Welfare State) संकल्पना स्वीकारली. त्यामुळे राजकीय धोरणाला आपोआप महत्व प्राप्त झाले.

## व्याख्या

(१) राजकोषीय धोरण म्हणजे अपेक्षित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सार्वजनिक उत्पन्न आणि खर्चामध्ये परिवर्तन करणे होय - जे. एम. केन्स

(२) सकारात्मक राजकोषीय धोरण याचा अर्थ असा कि, कर आणि सार्वजनिक खर्च यांना आकार देण्याची अशी प्रक्रिया कि ज्याद्वारे व्यापारचक्राचे चढ-उतार कमी करण्यास मदत होते तसेच प्रगतीशील उच्च रोजगार पातळी असलेल्या अर्थव्यवस्थेला तेजी - मंदीपासून मुक्त राखता येईल - प्रा.सॅाम्युलसन

## राजकोषीय धोरणाची साधने

राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सरकारला ज्या साधनांचा वापर करता येतो ती साधने त्यात पुढील साधनांचा समावेश होतो.

(१) **कर (Tax) :** सरकारला उत्पन्न मिळवून देणारे साधन म्हणून कर महत्वाचे ठरतात. सरकारला प्राप्तीकर, कंपनी कर, देणगी कर, यांसारख्या प्रत्यक्ष कराबरोबरच, आयात निर्यात कर, पेट्रोल व डिझेलवरील कर, वस्तू व सेवा कर यासारख्या अप्रत्यक्ष करांपासून उत्पन्न मिळते. प्रत्यक्ष कर हे श्रीमंताकडील अतिरिक्त पैसा काढून घेतात त्यामुळे ते आर्थिक विषमता कमी करणारे ठरतात.

(२) **सार्वजनिक खर्च (Public Expenditure) :** लोकांच्या सामाजिक गरजा भागविण्यासाठी आणि आर्थिक व सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी सरकारकडून जो खर्च केला जातो त्यास 'सार्वजनिक खर्च' असे म्हणतात. सरकार सार्वजनिक खर्चाद्वारे रस्तेबांधणी, पाटबंधारे, वाहतूक, दळणवळ, अनुदाने, इत्यादी बाबीवर खर्च करून गरीब लोकांच्या उत्पन्न व राहणीमानात वाढ करण्याचे प्रयत्न करतात. त्यामुळे सार्वजनिक खर्चास अंत्यत महत्व प्राप्त झालेले आहे.

(३) **सार्वजनिक कर्ज :** अर्थव्यवस्था कुठल्याही प्रकारची असो प्रत्येक सरकारला उत्पन्न मिळवावे लागते व खर्च हा करावा लागतो. मात्र ज्यावेळी खर्चासाठी कर आणि करेतर मार्गाने मिळणारे उत्पन्न कमी पडते त्यावेळी सरकार देशातील व्यक्ती, संस्था, देशाची मध्यवर्ती बँक, विदेशी सरकारे किंवा आंतरराष्ट्रीय संस्था यांच्याकडून कर्ज घेऊन आपला खर्च पूर्ण करते. अशा कर्जाला सार्वजनिक कर्ज असे म्हणतात. सरकारने सार्वजनिक कर्जाचा वापर उत्पादक कार्यासाठी केला तर देशाचे उत्पन्न वाढून कर्जाची परतफेड करतांना अडचण येत नाही. मात्र ते जर अनुत्पादक कामासाठी वापरले गेले तर त्या कर्जाची परतफेड करतांना अधिकचे कर आकारावे लागतात किंवा नवीन कर्ज घेऊन जुन्या कर्जाची परतफेड केली जाते. असे करणे राजकोषीय शिस्तीत बसत नाही; परंतु आपल्या देशाच्या बाबतीत मात्र वारंवार असे घडतांना दिसून येते.

(४) **अर्थसंकल्प :** अर्थसंकल्प किंवा अंदाजपत्रक हे राजकोषीय धोरणाचे एक महत्वाचे साधन आहे.

पुढील आर्थिक वर्षात सरकारचे अपेक्षित उत्पन्न आणि खर्च यांचा अंदाजित लेख जोखा म्हणजे अर्थसंकल्प होय. सरकारच्या राजकोषीय धोरणाला अंदाजपत्रक निधी उपलब्ध करून देण्याचे काम करते. केन्सने तुटीच्या अंदाजपत्रकाचा

पुरस्कार केलेला होता. सामान्यपणे विकसनशील देशांचे अंदाजपत्रक तुटीचे असावे.

अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्रामध्ये राजकोषीय धोरण म्हणजे सरकारी महसूल (कर किंवा कर कपात) आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर जाणीवपूर्वक परिणाम करण्यासाठी खर्चाचा वापर करणे होय. व त्याचे प्रमुख साधन म्हणजे राजकोषीय धोरण होय. राजकोषीय धोरण खालील स्थूल आर्थिक चलांवर परिणाम करतात.

(१) एकूण मागणी आणि आर्थिक व्यवहार पातळी

(२) बचत आणि गुंतवणूक

(३) उत्पन्न वितरण

(४) संसाधनांचे वाटप.

राजकोषीय धोरणाची परिणामकारकता वाढविण्यासाठी वेगवेगळे प्रतिमाने वापरली जातात. अर्थव्यवस्थेच्या स्थितीनुसार, राजकोषीय धोरण वेगवेगळ्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचू शकते. राजकोषीय धोरणाचा उद्देश महागाई कमी करून अर्थव्यवस्थेला उत्तेजन देणाऱ्या विविध प्रकल्पांवर खर्च करण्यास मुभा किंवा प्रोत्साहन देणे व त्याद्वारे आर्थिक विकास साध्य करणे हा आहे.

**राजकोषीय धोरण तीन प्रकारचे असते.**

(अ) तटस्थ धोरण : जेव्हा अर्थव्यवस्था मंदीत नसते तेव्हा तटस्थ धोरण घेतले जाते.

(आ) विस्तारक धोरण : व्यापार चक्रात आकुंचन होत असतांना सामान्यतः मंदीच्या काळात, समतोल साधण्याचा प्रयत्न करताना सरकारद्वारे विस्तारित धोरण वापरले जाते. यात सरकारी खर्चाचा समावेश होतो जो कर महसुलाच्या प्रवृत्तीपेक्षा जास्त असतो. विस्तारात्मक धोरण उपायांच्या उदाहरणांमध्ये सार्वजनिक कामांवर सरकारी खर्चात वाढ (उदाहरणार्थ, शाळा बांधणे) करून अर्थव्यवस्थेतील नागरिकांची क्रयशक्ती वाढवण्यासाठी कर कपात करणे यांचा समावेश होतो.

### (अ) आकुंचनात्मक धोरण

एकूण मागणी आणि पैशाच्या पुरवठ्यात लक्षणीय वाढ झाल्यामुळे महागाई वाढल्यास करांचे दर वाढविणे आणि सरकारी खर्च कमी करण्याच्या धोरणास आकुंचनात्मक धोरण असे म्हणतात. या स्थितीत सरकारी खर्च नेहमीपेक्षा कमी केला जातो. आर्थिक वाढ मंदावण्याची क्षमता यात आहे. अर्थव्यवस्थेच्या एकूण उत्पन्नाची रक्कम कमी करून, ग्राहकांच्या हातातील अतिरिक्त रक्कम कमी केली जाते. तर, जेव्हा अनिश्चित वाढ होते तेव्हा आकुंचनात्मक वित्तीय धोरण उपाय वापरले जातात, ज्यामुळे महागाई, गुंतवणुकीच्या उच्च किमती, मंदी आणि बेरोजगारी ३%-४% च्या वर जाते.

## राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे

देशपरत्वे राजकोषीय धोरणांची उद्दिष्टे वेगवेगळी असतात. विकसित देश आर्थिक स्थैर्य राखण्याचा प्रयत्न करतात. तर विकसनशील देश आर्थिक विकास, आर्थिक समानता यासाठी प्रयत्नशील असतात. स्थूलमानाने राजकोषीय धोरणाची पुढील उद्दिष्टे सांगता येतील.

(१) **आर्थिक स्थैर्य :** विकसित देशांचा आर्थिक विकास झालेला असतो त्यामुळे तो टिकवून ठेवणे हे त्यांच्या राजकोषीय धोरणाचे प्राधान्यक्रमाचे उद्दिष्टे असते. भांडवली देशांत व्यापार चक्रे वारंवार येत असतात. अशा चक्रांपासून अर्थव्यवस्थेचे रक्षण करणे गरजेचे असते.

(२) **रोजगार पातळीत वाढ :** पूर्ण रोजगाराची पातळी गाठणे हे प्रत्येक अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट असते. रोजगार पातळी वाढविण्यासाठी सार्वजनिक खर्च महत्वाची भूमिका बजावते. शेती व उद्योग क्षेत्रात मोठी गुंतवणूक करून रोजगाराच्या नवनव्या संधी उपलब्ध करून देता येतात.

(३) **आर्थिक विकास :** आर्थिक विकास साध्य करणे हे अल्पविकसित व विकसनशील देशांचे प्रमुख ध्येय असते. अल्पविकसित देशांचे दरडोई उत्पन्न कमी असल्याने भांडवल संचय कमी राहतो. परिणामी कर उत्पन्नावर दाब निर्माण होतो. त्यामुळे या देशांना विदेशी कर्जाचा मार्ग स्वीकारावा लागतो.

(४) **उत्पन्न वाटपातील विषमता कमी करणे :** सरकार करविषयक साधनांचा वापर करून देशांतील श्रीमंत लोकांच्या उत्पन्नातून काही हिस्सा काढून घेते व तो समाजातील गरीब वर्गाच्या सोयी सुविधांवर खर्च करून त्यांचे वास्तव उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करते. म्हणून आर्थिक विषमता कमी करणे हे सरकारच्या राजकोषीय धोरणाचे उद्दीष्ट मानले जाते.

(५) **राहणीमानात सुधारणा करणे :** अल्पविकसित देशात बेकारी, दारिद्र्य, आर्थिक विषमता यांमुळे राहणीमानाचा दर्जा

निकृष्ट असतो. या देशांतील लोकांच्या किमान मुलभूत गरजांची पूर्तता झालेली नसते. त्यामुळे अशा देशांच्या राजकोषीय धोरणाचा उद्देश या मागास वर्गासाठी शिक्षण, आरोग्याच्या सुविधा, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा हि सर्व जबाबदारी सरकारलाच उचलावी लागते. या सर्व बाबीद्वारे लोकांच्या राहणीमानाच्या पातळीत वाढ करणे हाच उद्देश असतो.

(६) **प्रादेशिक असमानता दूर करणे :** देशात काही राज्ये हि विकसित तर काही अत्यंत मागासलेली आहेत. मागास राज्यांना 'बिमारू' असे म्हणतात. नवनवीन उद्योजक आपले भांडवल गुजरात, महाराष्ट्र, तामिळनाडू, दिल्ली, इत्यादी राज्यात गुंतवीण्यास तयार असतात. मात्र उत्तरप्रदेश, बिहार तिकडे गुंतवणूक करत नाही. त्यामुळे प्रादेशिक समतोल निर्माण होतो. हा असमतोल दूर करण्यासाठी मागासलेल्या प्रदेशांना विशेष सुविधा पुरविणे, तेथील उद्योगांना सेवा सवलती देणे हे राजकोषीय धोरणाचे उद्दिष्टे असते. याद्वारे त्या प्रदेशाचा विकास होऊन असमतोल दूर होतो.


(७) **किंमत पातळीचे स्थैर्य :** किंमत पातळीत होणाऱ्या बदलाचे परिमाण समाजातील विविध वर्गावर होत असतात. किंमत वाढीचा लाभ व्यापारी व उद्योजक वर्गाला अधिक होऊन ते गर्भश्रीमंत बनतात तर सर्वसामान्यांना किंमतवाढीचा सामना करावा लागतो व त्यांची परिस्थिती दयनीय होत जाते. किंमतपातळीतील चढ उतारामुळे व्यावसायिक जगतात अनिश्चिततेचे वातावरण निर्माण होते. म्हणून किंमातापातळीत स्थैर्य राखणे हे राजकोषीय धोरणाचे उद्दिष्टे आहे.

## राजकोषीय व चलनविषयक किंवा मौद्रिक धोरण यातील परस्परावलंबन

राजकोषीय धोरण हे चलनविषयक धोरणापेक्षा वेगळे आहे. राजकोषीय धोरणा कर आकारणी आणि सरकारी खर्चाशी संबंधित आहे आणि त्याची आखणी व अंमलबजावणी सरकारी विभागाद्वारे केली जाते; तर चलनविषयक धोरण पैशांचा पुरवठा, व्याजदर यांच्याशी संबंधित आहे आणि देशाच्या मध्यवर्ती बँकेद्वारे म्हणजेच भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे राबविले जाते. राजकोषीय आणि चलनविषयक दोन्ही धोरणे देशाच्या आर्थिक कामगिरीवर प्रभाव टाकतात. तथापि, या व्याख्या भ्रामक असू शकतात कारण, खर्च किंवा कर कायद्यांमध्ये अजिबात बदल नसतानाही, अर्थव्यवस्थेच्या चक्रीय चढउतारांमुळे कर महसूल आणि काही प्रकारच्या सरकारी खर्चात चक्रीय चढ-उतार होतात, ज्यामुळे तूट परिस्थिती बदलते; हे धोरण बदल मानले जात नाहीत. म्हणून, वरील व्याख्येच्या उद्देशाने, सरकारी खर्च आणि कर महसूल सामान्यत: चक्रीय समायोजित सरकारी खर्च आणि चक्रात्मक समायोजित कर महसूल ने बदलले जातात. अशाप्रकारे उदाहरणार्थ, व्यवसाय चक्रादरम्यान समतोल असलेले सरकारी बजेट हे तटस्थ आणि प्रभावी राजकोषीय धोरणाचे प्रतिनिधित्व मानले जाते.

लष्करी आणि पोलिसांपासून ते शिक्षण आणि आरोग्य सेवा, तसेच कल्याणकारी लाभांसारख्या देयके हस्तांतरित करण्यासाठी सरकार विविध गोष्टींवर पैसा खर्च करते. हा खर्च विविध मार्गांनी केला जाऊ शकतो:

खड-ङ्च् मॉडेल हे वित्तीय विस्ताराचे परिणाम समजून घेण्याचा आणखी एक मार्ग आहे. जसजसा सरकार खर्च वाढवते, तसतसे खड वक्र वर आणि उजवीकडे शिफ्ट होईल. अल्पावधीत, यामुळे वास्तविक व्याजदर वाढतो, ज्यामुळे नंतर खाजगी गुंतवणूक कमी होते आणि एकूण मागणी वाढते, पुरवठ्यावर वरचा दबाव येतो. एकूण मागणीतील अल्पकालीन वाढ पूर्ण करण्यासाठी, कंपन्या पूर्ण-रोजगार उत्पादन वाढवतात. अल्पकालीन किमतीच्या पातळीत वाढ झाल्यामुळे पैशाचा पुरवठा कमी होतो, ज्यामुळे ङ्च् वक्र मागे सरकतो आणि त्यामुळे सामान्य समतोल मूळ पूर्ण रोजगार (FE) स्तरावर परत येतो. म्हणून, IS-LM मॉडेल असे दर्शविते की वित्तीय विस्तारामुळे दीर्घकाळात किंमत पातळी आणि वास्तविक व्याजदरांमध्ये एकूण वाढ होईल.




IS वक्र उजवीकडे सरकतो, वास्तविक व्याजदर (r) वाढतो आणि वास्तविक अर्थव्यवस्थेत (वास्तविक GDP, किंवा Y) विस्तार होतो.

## भारताच्या राजकोषीय धोरणांचा आढावा

भारताने सन १९५१ पासून जलद आर्थिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक नियोजनाचा स्वीकार केला. त्यासाठी एकाच वेळी चलनविषयक व राजकोषीय धोरणाचा अवलंब करून आर्थिक विकासाचे उद्दिष्टे गाठत असतांनाच किंमतपातळी स्थिर ठेवणे, रोजगार पातळीत वाढ करणे, समतोल विकास साध्य करणे, विषमता कमी करून न्यायासह विकास साध्य करणे हि उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न केला गेला. १९९० पर्यंत संमिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केलेला होता मात्र १९९१ पासून सरकारने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्याने अर्थव्यवस्थेची वाटचाल मुक्त अर्थव्यवस्थेच्या दिशेने सुरू झाली. १९९१ पर्यंत अप्रत्यक्ष करांपासून सरकारला अधिक उत्पन्न मिळत होते; परंतु १९९१ नंतर प्रत्यक्ष कारापासुनचे उत्पन्न वाढलेले दिसून येते.

केंद्र सरकारला करेतर उत्पन्नातून म्हणजेच सार्वजनिक उद्योगांचा नफा यातून उत्पन्न मिळत होते; परंतु बरेचसे उद्योग तोट्यात चालत असल्याने व काही उद्योग विकल्याने त्यापासून मिळणारे उत्पन्न अत्यल्प राहिले आहे.

पूर्वी संपत्ती कर, विक्री कर, असे कर होते २००५ मध्ये मूल्यवर्धित कर (VAT) आला व २०१७ पासून पेट्रोल व डीझेल वगळता सर्व वस्तूंवर वस्तू व सेवा कर (GST) कर लागू झालेला आहे.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**गाळलेल्या जागा भरा.**

(१) राजकोषीय धोरणाचे ------- साधन आहे?
(अ) बँक दर (ब) कर (क) राखीव निधी प्रमाण

(२) राजकोषीय धोरणाची आखणी ------केली जाते?
(अ) आरबीआय (ब) मध्यवर्ती सरकार (क) जागतिक बँक

(३) तेजीच्या काळातील ------ धोरण फायदेशीर ठरते?
(अ) खर्च वाढविणे (ब) खर्च कमी करणे (क) करांचे दर कमी करणे

# १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **मौद्रिक धोरण :** पैशाच्या पुरवठ्यावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्यासाठी देशाच्या मध्यवर्ती बँकेकडून आखले जाणारे धोरण.
- **राजकोषीय धोरण :** केंद्र सरकार कर, खर्च व कर्ज याबाबत ठरवीत असलेले धोरण.
- **IS-LM वक्र :** Investment गुंतवणूक, Saving बचत व Liquidity Preference रोखता प्राधान्य, Money Supply पैशाचा पुरवठा

# १.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) (ब) कर

(२) (ब) मध्यवर्ती सरकार

(३) (ब) खर्च कमी करणे

## १.५ सारांश

राजकोषीय धोरण करआकारणी, सार्वजनिक खर्च, कर्जउभारणी आणि सार्वजनिक कर्जाची व्यवस्थापन, यासबंधी सरकारच्यानिर्णयाशी निगडीत असते. कर आकारणी धोरणामार्फत किती प्रमाणात पैसा बाहेर काढला जाऊ शकतो व सार्वजनिक खर्च याद्वारे किती पैसा अर्थव्यवस्थेत वाढवू शकतो याची संख्या ठरत असते. यावरून आर्थिक विकासाची गती व दिशा निश्चित होऊन अर्थव्यवस्थेला संकेत मिळतात.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

(१) राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे लिहा?

(२) मौद्रिक व राजकोषीय धोरणे परस्पर पूरक आहेत हे स्पष्ट करा?

(३) तेजी व मंदीच्या काळात राजकोषीय धोरणाचा परिमाण IS-LM वक्राच्या सहाय्याने स्पष्ट करा?

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) ओझरकर सु. रा., *राजस्व,* नागपूर, विद्या प्रकाशन

(२) दातीर, कदम, लोमटे, चिंतामणी, *सार्वजनिक आय-व्यय,* पुणे, निराली प्रकाशन

(३) उशीर, जावळे, सय्यद, आढाव, *सार्वजनिक आय-व्यय,* पुणे, निराली प्रकाशन

(४) प्रतियोगिता दर्पण, *भारतीय अर्थव्यवस्था,* आग्रा

(५) दत्त आणि सुंदरम, *भारतीय अर्थव्यवस्था,* दिल्ली, एस. चंद पब्लिकेशन

(६) Does Fiscal Policy Matter?, (1972), *Blinder Solow,* New Jersey, Princeton University

# घटक २ : २०१० पासूनच्या भारतातील अंदाजपत्रकातील प्रवृत्ती-खर्च व महसूल संदर्भात

***अनुक्रमणिका***

२.० उद्दिष्टे
२.१ प्रास्ताविक
२.२ विषय-विवेचन
२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
२.५ सारांश
२.६ सरावासाठी स्वाध्याय
२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- अर्थसंकल्पाचा अर्थ व प्रक्रिया समजावून घेणे.
- अर्थसंकल्प व त्यातील महत्वाच्या संकल्पना समजावून घेणे.

## २.१ प्रास्ताविक

अर्थसंकल्प किंवा अंदाजपत्रक/ बजेट. विशिष्ट आर्थिक परिस्थितीने लादलेल्या आर्थिक मर्यादांनुसार जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याची कला म्हणजे अर्थसंकल्प. प्रत्येक व्यक्तीला आणि संघटनेला अर्थसंकल्प आखावा लागतो. त्यानुसार आपले खर्चाचे आणि उत्पादनाचे कार्यक्रम योजावे लागतात. मर्यादित प्रमाणात असलेल्या साधनसामग्रीचे कार्यक्षमपणे वाटप करण्याची कसरत शासनालाही करावी लागते. अर्थसंकल्प सामान्यतः एका वर्षापुरता असला, तरी त्यापेक्षा कमी किंवा अधिक कालखंडाकरिता तो तयार केला जातो. बजेट हा इंग्रजी शब्द मूळ फ्रेंच Bougettee (कातडी पिशवी) ह्या शब्दावरून आला आहे. शेक्सपिअरच्या नाटकातील विदुषक एक पेटी घेऊन येत असे व त्यातून वेगवेगळ्या वस्तू काढून प्रेक्षकांची करमणूक करीत असे आणि त्यांना आश्चर्याचा धक्का देत असे. अर्थसंकल्प मांडताना ब्रिटिश अर्थमंत्री छोट्या थैलीतून आगामी वर्षांची आयव्ययविषयक कागदपत्रे बाहेर काढून संसदेपुढे ठेवतात व लोकांना आश्चर्याचा धक्का देत असतात. त्यामुळे अर्थसंकल्पासाठी इंग्रजीत बजेट हा शब्द प्रचलीत आहे. सर्वप्रथम १८०३मध्ये बजेट या शब्दाचा प्रयोग फ्रान्समध्ये केला गेला. अर्थसंकल्प म्हणजे वर्षभराचे आर्थिक समायोजन. ज्या संकल्पात आर्थिक धोरणे जाहीर होतात त्यास अर्थसंकल्प असे म्हणतात. प्रत्येक आस्थापन म्हणजे देश, राज्य ते नगरपालिका आणि ग्रामपंचायतही आपला बजेटमध्ये शासनाच्या पुढील वर्षांच्या उत्पन्न आणि खर्च याचा लेखा मांडला जातो.

सर्व देशांत अंदाजपत्रक संसदेत मांडण्यापर्यंत ते फक्त अर्थमंत्री व त्यांच्या टीम ला माहित असते. इंग्लंडमध्ये डॉ. डाल्टन यांना त्याच्या बजेटमधील तरतुदी काही मिनिटे अगोदर लोकांना समजल्यामुळे राजीनामा द्यावा लागला होता.

## २.१ विषय-विवेचन

### व्याख्या

(१) **जे. एल. हैन्सोन :** शासनाच्या खर्चाचा आणि महसुलाचा पुढील वर्षांचा अंदाज म्हणजे अंदाजपत्रक होय.

(२) **सी. एल. किंग :** अंदाजपत्रक म्हणजे ज्याद्वारे खर्च आणि उत्पन्न या दोन्हीत समतोल प्रस्थापित केला जातो अशी वित्तीय योजना होय.

### अंदाजपत्रकाचे स्वरूप

अंदाजपत्रकात आगामी वर्षातील अपेक्षित उत्पन्न आणि अपेक्षित खर्च यांचा मेळ घातला जातो. त्यात केंद्र सरकारच्या महसुलाच्या विविध मार्गाचे तपशीलवार विवेचन केलेले असते. तसेच कोणकोणत्या कार्यक्रमांवर किती खर्च होईल याचेही वर्णन असते. अंदाजपत्रकात महसुली तुट, वित्तीय तुट, प्राथमिक तुट, इत्यादी प्रकारच्या तुटींचे मोजमाप आढळते.

### अंदाजपत्रकाचे प्रकार

#### (१) महसुली अंदाजपत्रक

महसुली अंदाजपत्रकात सरकारच्या महसुली उत्पन्न आणि महसुली खर्च यांचा समावेश केला जातो.

#### महसुली उत्पन्न आणि खर्च

शासनाच्या रोजच्या व्यवहारातून येणारे उत्पन्न, जसे कर उत्पन्न हे महसुली उत्पन्न म्हणून धरले जाते. तसेच रोजच्या खर्चाला, जसे कर्जावरील व्याज, अनुदान याला महसुली खर्च असे म्हणतात.

महसुली अंदाजपत्रक हे शिलकीचे असावे. म्हणजेच यातील जमा रकमेपेक्षा खर्च होणारी रक्कम कमी असली पाहिजे. कर जमा करण्यसाठी येणारा खर्च हा त्या रकमेपेक्षा कमी असावा. व यातील शिल्लक भांडवली खात्यात खर्च केले तर अति उत्तम असते.

#### (२) भांडवली अंदाजपत्रक

भारत सरकारच्या अंदाजपत्रकाच्या दुसऱ्या भागाला भांडवली अंदाजपत्रक असे म्हणतात. भांडवली उत्पन्नच्या बाजूवर नाणेबाजारातील कर्जे, परकीय कर्जे, अल्पबचत, परकीय चलनसाठा, उद्योगधंदे सुरू करण्यसाठीच्या तरतुदी यामध्ये असतात.

### भांडवली उत्पन्न आणि खर्च

शासनाला सार्वजनिक उद्योगातून मिळणारा नफा, रिझर्व बँक, जनता आणि इतर स्वरूपात मिळणाऱ्या कर्जाला भांडवली उत्पन्न असे म्हणतात. विशिष्ट दीर्घकालीन योजनांवर होणाऱ्या खर्चाला, ज्यात, मशीन घेणे, इत्यादी भांडवली खर्च असे म्हणतात.

सर्वसामान्यपणे भांडवली अंदाजपत्रक हे तुटीचे असावे. म्हणजेच उत्पन्नापेक्षा जास्तीचा खर्च केला जावा. कारण आजचा खर्च हे उद्याचे उत्पन्न असते. तसेच महसुली खात्यातील शिल्लक रक्कम येथे खर्च केली जावी असा संकेत आहे; परंतु भारताच्या अंदाजपत्रकाचा विचार करता हे अंदाजपत्रक शिलकीचे दिसून येते व त्यातील शिल्लक रक्कम महसुली खर्चासाठी वापरली जाते. हे भविष्याच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे. म्हणजेच सरकार उत्पादक खर्चापेक्षा अनुत्पादक खर्च अधिक करत आहे.

#### (३) शिलकीचे अंदाजपत्रक

**व्याख्या**

जर सरकारचे उत्पन्न हे खर्चापेक्षा अधिक असेल तर अंदाजपत्रकात शिल्लक उरते तेव्हा त्या अंदाजपत्रकास शिलकीचे अंदाजपत्रक असे म्हणतात.

कौटिल्य यांनी आपल्या कौटिल्याचे अर्थशास्त्र या ग्रंथात ज्या राज्याचे अंदाजपत्रक शिलकीचे असते ते राज्य आदर्श ठरते. असे मांडलेले आहे. ए पी. लर्नर यांनी अर्थव्यवस्थेचे कार्य सुरळीत चालण्यासाठी कार्यात्मक वित्ताची संकल्पना मांडली

त्यात त्यांनी शिलकी अंदाजपत्रकाला प्राधान्य दिले आहे; परंतु आज कुठलाही देश शिलकीचे अंदाजपत्रक अंमलात आणत नाही.

### (४) तुटीचे अंदाजपत्रक

**व्याख्या**

जेव्हा सरकारला मिळणाऱ्या महसुलापेक्षा होणारा खर्च आधिक असतो तेव्हा अंदाजपत्रकात तुट निर्माण होते. त्याला तुटीचे अंदाजपत्रक असे म्हणतात.

१९२९-३३ च्या जागतिक महामंदी नंतर केन्सने तुटीच्या अंदाजपत्रकाचा पुरस्कार व प्रचार केला. सनातनवादी 'कर उत्पन्नापेक्षा सरकारी खर्च अधिक असणे' अशी तुटीची व्याख्या करतात. तुट दोन प्रकारे निर्माण करता येते.

(अ) कर उत्पन्नात बदल न करता सरकारी उत्पन्नात वाढ करून

(आ) सरकारी खर्च स्थिर ठेवून करांच्या दरात घट करून

तुटीच्या अंदाजपत्रकामुळे प्रभावी मागणीत वाढ होणे, युद्धजन्य परिस्थितीत मोठा खर्च भागविणे, दारिद्र्य व बेकारी निर्मुलन करण्यासाठी योजना राबविणे व त्याद्वारे आर्थिक विकास साध्य करणे हे अनुकूल परिमाण होतात. तर चलनवाढ, भाववाढ, बचतीत घट, इत्यादी प्रतिकूल परिमाण देखील होतात.

### (५) समतोल अंदाजपत्रक

**व्याख्या**

ज्या अंदाजपत्रकात विशिष्ट काळात खर्चापेक्षा उत्पन्न कमी पडत नाही त्या अंदाजपत्रकाला संतुलित किंवा समतोल अंदाजपत्रक असे म्हणतात - डॉ. डाल्टन

समतोल अंदाजपत्रकाचे समर्थन अडम स्मिथ, जे.बी.से., रिकार्डो इ. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञानी केले होते.

### (६) अंतरिम अर्थसंकल्प

अंतरिम अर्थसंकल्पाला मध्यावर्ती अर्थसंकल्प (Intermediate Budget) असे म्हणतात, कमी कालावधीसाठी असे बजेट मांडले जाते. संपुर्ण आर्थिक वर्षासाठी (१एप्रिल ते ३१मार्च) अर्थसंकल्प न मांडता मर्यादित कालावधीसाठी अर्थसंकल्प मांडण्यात आला असेल तर त्यास अंतरिम अर्थसंकल्प म्हणतात. असे बजेट एक वर्षा पेक्षा कमी कालावधी साठी मांडले जाते. असे बजेट केव्हा सादर केले जाते. युद्धजन्य परिस्थितीत असल्यास, निवडणुका, आर्थिक संकट, नैसर्गिक आपत्ती, इत्यादी अशा परिस्थितीत अंतरिम अर्थसंकल्प किंवा मध्यावर्ती अर्थसंकल्प सादर केला जातो.

### (७) हंगामी अर्थसंकल्प

ज्या अर्थसंकल्पात मिळकत कमी व खर्च जास्त असतो त्याला तुटीचा अर्थसंकल्प म्हणतात. तुटीच्या अर्थसंकल्पाने महागाई वाढते. केन्स या अर्थतज्ञाने १९३३मध्ये तुटीचा अर्थसंकल्प मांडण्याचा सल्ला दिला, भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंचवार्षिक योजनाद्वारा नियोजन आणि विकास साध्य करण्यासाठी शासनाला अतिरिक्त पैशांची गरज होती . त्यामुळे शासनाने तुटीच्या अर्थसंकल्पाचे धोरण वापरणे चालू ठेवले.

## भारतीय अर्थसंकल्प

आर.के. षण्मुखम शेट्टी यांनी अविभाजित भारत व स्वतंत्र भारत या दोघांसाठी अर्थसंकल्प सादर केला. स्वतंत्र भारताचा पाहिला अर्थसंकल्प आर.के. षण्मुखम शेट्टी यांनी २६ नोव्हेंबर १९४७ ला सादर केला तो १५ ऑगस्ट १९४७ ते ३१ मार्च १९४८ या साडेसात महिन्याचा होता. जॉन मथाई यांनी भारतीय गणराज्यासाठीचा पहिला अर्थसंकल्प १९५० साली सादर केला. हिंदी भाषिक नसतांना सी.डी.देशमुख यांनी अर्थमंत्री असतांना १९५५-५६ चे अंदाजपत्रक मांडतांना ते हिंदीत छापावे असे मंजूर करून घेतले. त्यागोदर ते फक्त इंग्रजीत छापले जात होते. भारतात चार अर्थमंत्री नंतर पंतप्रधान झाले. मोरारजी देसाई, चौधरी चरणसिंग, विश्वनाथ प्रतापसिंग आणि मनमोहन सिंग तर एक अर्थमंत्री प्रणव मुखर्जी राष्ट्रपती झाले. प्रधानमंत्री असतांना जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि मनमोहन सिंग यांच्याकडे अर्थ खात्याचा कार्यभार होता. २००९-१० चे बजेट अर्थमंत्री नसतांना प्रणव मुखर्जी यांनी मांडले अर्थ खात्याचा कार्यभार प्रधानमंत्री यांच्याकडे होता. मोरारजी देसाई यांनी सर्वात जास्त वेळा १० वेळा अर्थसंकल्प सादर केला आहे. तर त्यापाठोपाठ पी.चींदबरंम यांनी ८ वेळा अंदाजपत्रक मांडले. इंग्रजांनी भारतात बजेट मांडण्याची वेळ सायंकाळी ५ वाजता ठेवली होती. १९९९ ला अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांनी ती वेळ बदलवून

सकाळी ११ वाजता केली. २५ फेब्रुवारी १९९२ ला सर्वप्रथम रेल्वे बजेट आणि २९ फेब्रुवारी १९९२ ला सामान्य बजेट दूरदर्शन वरून प्रसारित करण्यात आले. दर वर्षाच्या फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवशी अर्थसंकल्प लोकसभेत सादर करतात. मात्र मोदी सरकारच्या काळात २०१७ तो १ फेब्रुवारी असा करण्यात आला. जेणेकरून आर्थिक वर्ष सुरूवातीलाच निधी उपलद्ध होईल. पूर्वी रेल्वे चे अंदाजपत्रक आणि मुख्य अंदाजपत्रक वेगळे सादर केले जात होते. मोदी सरकारने ते पुन्हा एकत्र सादर करण्यास सुरवात केली.

## अंदाजपत्रक तयार करण्याची पद्धती

अंदाजपत्रक मांडत असतांना आपण जरी म्हणत असलो कि आगामी वर्षात सरकारचा होणारा खर्च आणि जमा यांची अंदाजित मांडणी केली जाते; परंतु प्रत्येक अर्थसंकल्पात ३ वर्षांचा उल्लेख किंवा समावेश असतो. उदाहरणार्थ, आपण १ फेब्रुवारी २०२३ ला सादर होणाऱ्या बजेट बद्दल विचार करू.

(अ) त्यात २०२३-२४ चे अंदाजपत्रक असणार आहे.

(आ) चालू आर्थिक वर्ष २०२२-२३ संपलेले नाही म्हणून त्याचे सुधारित अंदाजपत्रक

(इ) जे वर्ष संपलेले आहे; परंतु बजेट सत्र २०२१ ला संपलेले नव्हते. त्या वर्षातील सर्व खर्चाला परवानगी घेतली जाते.

या पद्धतीने प्रत्येक अर्थसंकल्प ३ आर्थिक वर्षांच्या जमा खर्चाचे विवरण मांडत असतो.

अंदाजपत्रक तयार करण्यासाठी विविध विभागाकडून माहिती गोळा करण्याचे काम सुरू असते. ग्राम पातळीपासून ते जिल्हा, राज्य, विविध शासकीय कार्यालयाकडून आर्थिक पाहणीबाबत आकडेवारी जमा करून डिसेंबरमध्ये त्यांचे एकत्रीकरण करून अहवाल तयार केला जातो. एका गोपनीय टीमकडून हे काम अर्थमंत्री यांच्या निरीक्षणात चालते. जेव्हा अर्थसंकल्प तयार होतो तेव्हा एका मोठ्या कढईमध्ये मिठाई बनविली जाते. अर्थसंकल्प लोकसभेत सादर होईपर्यंत तयार करणाऱ्या कुणालाही घरी जाता येत नाही. अर्थसंकल्प लोकसभेत मांडण्या अगोदर कुणाला माहित झाला तर (लिक होणे) सरकारला राजीमाना द्यावा लागतो.

डिमांड फॉर ग्रांट्स शासनाचे सर्व खर्च सामायिक खात्यातून करावयाचे असल्याने, त्या खर्चासाठी शासनाला संसदेकडे मागणी गरवी लागते. ही मागणी एप्रोप्रिएशन बिलच्या स्वरुपात केली जाते. बजेटमध्ये सांगितल्याप्रमाणे प्रत्येक मिनिस्ट्री आपापल्या विभागाला ला लागणाऱ्या खर्चाचा आकडा देऊन त्याप्रमाणे मागणी संसदेपुढे मांडते. कर्जावरील व्याज ह्या सारखे काही खर्च नेहमीचे असल्याने (चार्ज्ड) त्यासाठी वेगळी मागणी करण्याची गरज नसते. मागणी करतानासुद्धा चार्ज्ड आणि वोटेड असे दोन भाग केले जातात हे डिमांड फॉर ग्रानट्स बजेट समवेत संसदेपुढे मांडले जातात. नंतर त्याची योजना खर्च (प्लान) आणि योजनेतर खर्च (नोन प्लान), महसुली खर्च आणि भांडवली खर्च अशी विभागणी केली जाते, आणि त्यावर सविस्तर चर्चा होते. वित्त विधेयकामध्ये प्रत्येक बजेटमध्ये कर विषयक तरतुदींमध्ये बदल केले जातात. ह्या तरतुदीमधील बदलही एका विधेयकाच्या स्वरूपातच संसदेसमोर मांडले जातात त्याला वित्त विधेयक असे म्हणतात. इतर कुठल्याही कायद्याच्या विधेयकाप्रमाणे ह्या विधेयकावर चर्चा होते, मतदान केले जाते आणि वित्त विधेयक मंजूर केले जाते. मात्र वित्त विधेयक हे प्रथमता लोकसभेतच मांडले जाते. त्यावर राज्यसभेला चर्चा करून मत देत येते. ते मत लोकसभेस बांधील नसते. त्यानंतर त्या त्या करांच्या कायद्यात (आयकर कायदा, सेवाकर कायदा, इत्यादी) बदल केले जातात. वोट ऑन अकाउंट्स एप्रोप्रिएशन बिलाद्वारे संसदेने खर्चांना मान्यता देईपर्यंत काही काळ जातो. या दरम्यान शासनाला खर्च करावे लागतातच. त्यासाठी संसद काही ठराविक रक्कम अगोदरच शासणासाठी मंजूर करून ठेवते. याला वोट ऑन अकाउंट्स म्हणतात. हेही अर्थात एप्रोप्रिएश्न बिलाद्वारेच मंजूर केले जाते. बजेट मंजुरी प्रक्रिया बजेट हे ११० अन्वये मनी बिल आहे. त्यामुळे त्यावर चर्चा करण्याचा आणि मतदान करण्याचा अधिकार केवळ लोकसभेलाच असतो. राज्यसभा केवळ त्यातील तरतुदींवर चर्चा करू शकते.

**बजेट सादर करणारे अर्थमंत्री व त्या कालावधीतील प्रधानमंत्री**

| अ.न. | वर्ष | अर्थ मंत्री | प्रधानमंत्री |
|---|---|---|---|
| (०१) | १९४७-४९ | आर. के षणमुखम शेट्टी | जवाहरलाल नेहरू |
| (०२) | १९४९-५१ | जॉन मथाई | जवाहरलाल नेहरू |
| (०३) | १९५१- ५७ | सी. डी. देशमुख | जवाहरलाल नेहरू |
| (०४) | १९५७-५८ | टी.टी. कृष्णामचारी | जवाहरलाल नेहरू |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| (०५) | १९५८ -५९ | जवाहरलाल नेहरू | जवाहरलाल नेहरू |
| (०६) | १९५९-६४ | मोरारजी देसाई | जवाहरलाल नेहरू |
| (०७) | १९६६-६७ | टी.टी. कृष्णामचारी | लाल बहादूर शास्त्री |
| (०८) | १९६६-६७ | सचिंद्र चौधरी | इंदिरा गांधी |
| (०९) | १९६७-७० | मोरारजी देसाई | इंदिरा गांधी |
| (१०) | १९७०-७१ | इंदिरा गांधी | इंदिरा गांधी |
| (११) | १९७१-७५ | यशवंतराव चव्हाण | इंदिरा गांधी |
| (१२) | १९७५-७७ | सी. सुभ्रमन्यम | इंदिरा गांधी |
| (१३) | १९७७-७८ | एच. एम. पटेल | मोरारजी देसाई |
| (१४) | १९७९-८० | चरण सिंग | चरण सिंग |
| (१५) | १९८० -८२ | आर. व्यंकटरमण | इंदिरा गांधी |
| (१६) | १९८२-८५ | प्रणव मुखर्जी | इंदिरा गांधी |
| (१७) | १९८५-८७ | व्ही.पी.सिंग | राजीव गांधी |
| (१८) | १९८७-८८ | राजीव गांधी | राजीव गांधी |
| (१९) | १९८८-८९ | एन. डी. तिवारी | राजीव गांधी |
| (२०) | १९८९-९० | शंकरराव चव्हाण | राजीव गांधी |
| (२१) | १९९०-९१ | मधु दंडवते | विश्वनाथ प्रताप सिंग |
| (२२) | १९९१-९२ | यशवंत सिन्हा | चंद्रशेखर |
| (२३) | १९९२-९६ | मनमोहन सिंग | पी.व्ही. नरसिंहराव |
| (२४) | १९९६-९८ | पी. चिदंबरम | एच.डी.देवगौडा, इंद्रकुमार गुजराल |
| (२५) | १९९८-०३ | यशवंत सिन्हा | अटल बिहारी वाजपेयी |
| (२६) | २००३-०४ | जसवंत सिंग | अटल बिहारी वाजपेयी |
| (२७) | २००४-०९ | पी. चिदंबरम | मनमोहन सिंग |
| (२८) | २००९-१० (अंतरिम बजेट) | मनमोहन सिंग | मनमोहन सिंग |
| (२९) | २००९-१३ | प्रणव मुखर्जी | मनमोहन सिंग |
| (३०) | २०१३ -१४ | पी. चिदंबरम | मनमोहन सिंग |
| (३१) | २०१४ -१५ (अंतरिम बजेट) | पी. चिदंबरम | मनमोहन सिंग |
| (३२) | २०१४-१५ (मुख्य बजेट) | अरुण जेटली | नरेंद्र मोदी |
| (३३) | २०१५-१८ | अरुण जेटली | नरेंद्र मोदी |
| (३४) | २०१९ - २३ | निर्मला सीतारामन | नरेंद्र मोदी |

**(Source : www.indiabudget.gov.in)**

**केंद्र सरकारच्या एकूण कर महसूल व करेतर महसूल**

| वर्ष | कर महसूल कोटी र | % | करेतर महसूल कोटी र | % | एकूण महसूल कोटी र |
|---|---|---|---|---|---|
| २०११-१२ | ६२९७६५ | ८३.८० | १२१६७२ | १६.२० | ७५१४३७ |
| २०१२-१३ | ७४१८७७ | ८४.३८ | १३७३५५ | १५.६२ | ८७९२३२ |
| २०१३-१४ | ८१५८५४ | ८०.४० | १९८८७० | १९.६० | १०१४७२४ |
| २०१४-१५ | ९०३६१५ | ८२.०३ | १९७८५८ | १७.९३ | ११०१४७३ |
| २०१५-१६ | ९४३७६५ | ७८.९७ | २५१२६० | २१.०३ | ११९५०२५ |
| २०१६-१७ | ११०१३७२ | ८०.१४ | २७२८३१ | १९.८६ | १३७४२०३ |
| २०१७-१८ | १२४२४८८ | ८६.५७ | १९२७४५ | १३.४३ | १४३५२३३ |
| २०१८-१९ | १५१७२११ | ८४.८२ | २३५७०४ | १५.१८ | १५५२९१६ |
| २०१९-२० | १३५६९०२ | ८०.५७ | ३२७१५७ | १९.४३ | १६८४०५९ |
| २०२०-२१ | १४२६१२१ | ८७.२९ | २०७६३४ | १२.७१ | १६३३७५५ |
| २०२१-२२ (BE) | १७६५१४४ | ८४.९१ | ३१३७९१ | १५.०९ | २०७८९३५ |

(Source : www.indiabudget.gov.in)

**केंद्र सरकारची सार्वजनिक खर्चाची प्रवृत्ती**

| वर्ष | एकूण खर्च (भांडवली + महसुली) कोटी र | GDP शी असलेले प्रमाण % |
|---|---|---|
| २०११-१२ | १३.०४ | १४.९ |
| २०१२-१३ | १५.१० | १४.२ |
| २०१३-१४ | १५.५९ | १३.९ |
| २०१४-१५ | १६.६३ | १३.३ |
| २०१५-१६ | १७.९० | १३ |
| २०१६-१७ | १९.७५ | १२.८ |
| २०१७-१८ | २१.४१ | १२.५ |
| २०१८-१९ | २३.१५ | १२.३ |
| २०१९-२० | २६.८६ | १३.२ |
| २०२०-२१ | ३५.१ | १७.८ |
| २०२१-२२ (BE) | ३७.७ | १५.६ |

(Source : www.indiabudget.gov.in)

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**गाळलेल्या जागा भरा.**

(१) अर्थसंकल्प हा ----- वर्षासाठी असतो.

(अ) एक (ब) दोन (क) तीन (ड) पाच

(२) केंद्रीय अर्थसंकल्प प्रथम ------ सभागृहात सादर केला जातो.

(अ) राज्यसभा (ब) लोकसभा (क) विधानसभा (ड) विधानपरिषद

(३) ---------- यांनी सर्वात जास्त वेळा अर्थसंकल्प सादर केला आहे.

(अ) नरेंद्र मोदी (ब) अमित शहा (क) मोरारजी देसाई (ड) निर्मला सितरामन

## २.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **अंतरिम बजेट :** जेव्हा सरकारचा कालावधी संपणार असतो तेव्हा फक्त काही महिन्यांसाठी बजेट मांडले जाते त्याला अंतरिम बजेट असे म्हणतात. जेव्हा सरकार बदलते तेव्हा नवीन सरकार पुढील कालावधीसाठी स्वताच्या सोयीने नवीन बजेट लोकसभेत मांडते त्यास मुख्य बजेट म्हणतात.
- **बजेट सत्र :** संसदेचे जसे हिवाळी अधिवेशन असते तसे बजेट सादर करण्यसाठी स्वतंत्र अधिवेशन बोलावले जाते त्यास बजेट सत्र असे म्हणतात.
- **आर्थिक वर्ष :** भारतात १ एप्रिल ते ३१ मार्च हा कालावधी आर्थिक वर्ष म्हणून गणला जातो.
- **वित्त विधेयक :** संसदेत मांडले जाणारे विधेयक जर आर्थिक बाबीशी निगडीत असेल तर त्यास वित्त किंवा धन विधेयक असे म्हणतात. ते प्रथमता लोकसभेतच मांडावे लागते.

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) (अ) एक

(२) (ब) लोकसभा

(३) (क) मोरारजी देसाई

## २.५ सारांश

बजेट हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. आपल्या वापरातील कोणत्या वस्तू महाग किंवा स्वस्त होणार ते कर, खर्च, जमा, कर्ज, देशाची आर्थिक पाहणी, कोणत्या योजनेसाठी किती निधी याची सर्व माहिती बजेट मधून सर्वांना मिळत असते. त्यामुळे बजेटच्या महत्वाच्या संकल्पना समजावून घेतल्या तर आपल्याला त्याचे आकलन सहज करता येते.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

(१) जास्तीत जास्त वेळा बजेट सादर केलेल्या अर्थमंत्री यांची यादी तयार करा ?

(२) बजेट अहवाल तयार करण्याची थोडक्यात लिहा ?

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) ओझरकर सु. रा., *राजस्व,* विद्या प्रकाशन, नागपूर

(२) दातीर, कदम, लोमटे, चिंतामणी, *सार्वजनिक आय-व्यय,* पुणे, निराली प्रकाशन

(३) उशीर, जावळे, सय्यद, आढाव, *सार्वजनिक आय-व्यय,* पुणे, निराली प्रकाशन

(४) प्रतियोगिता दर्पण, *भारतीय अर्थव्यवस्था,* आग्रा

(५) दत्त आणि सुंदरम, *भारतीय अर्थव्यवस्था,* दिल्ली, एस. चंद पब्लिकेशन

(६) जे. एफ. पाटील, *सार्वजनिक अर्थकारण,* कोल्हापूर, फडके प्रकाशन

(७) www.indiabudget.gov.in

(८) www.mahakosh.maharashtra.gov.in

# घटक ३ : भारतातील कर आकारणीचे प्रकार : वस्तू व सेवा कर

*अनुक्रमणिका*


३.० उद्दिष्टे
३.१ प्रास्ताविक
३.२ विषय-विवेचन
३.३ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
३.४ सारांश
३.५ सरावासाठी स्वाध्याय
३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- करांचे महत्त्व आणि गरज समजावून घेणे.
- करांचे प्रकार व वैशिष्ट्ये अभ्यासणे.
- करआकारणीच्या बदलांचा आढावा घेणे.

## ३.१ प्रास्ताविक

कर हा सार्वजनिक सत्तेकडून लावले जातात. कर लावण्याचा अधिकार केवळ सरकारला आहे. कर देशाचा अत्यावश्यक भाग आहेत. सरकारला अनेक खर्च करावे लागतात व त्यसाठी उत्पन्न मिळवावे लागते. उत्पन्न प्राप्तीचा सर्वात महत्त्वाचा मार्ग म्हणजे कर होय. उत्पन्न मिळविणे हे कारआकारणीचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. असे डॉ. डाल्टन यांनी सांगितले आहे.

## ३.२ विषय-विवेचन

### व्याख्या

- **सेलीगमन :** कर हा व्यक्तीकडून घेतला जातो व तो सर्वांच्या हितासाठी खर्च केला जातो आणि वैयक्तिक लाभाशी त्याचा काहीही सबंध नाही.
- **ॲडम स्मिथ :** कर म्हणजे राज्यासाठी नागरिकांनी केलेले अंशदान होय.
- **डॉ. डाल्टन :** कर हे सक्तीचे देणे आहे व त्याचा सममूल्य सेवेशी काही सबंध नाही त्याचप्रमाणे कर हा कोणत्याही गुन्ह्याबद्दल लावलेला दंड नसून तो मूल्य, शुल्क, दंड यापेक्षा पूर्णपणे वेगळा आहे.

आपण भरतो तो कर देशातील विविध क्षेत्रांमध्ये सुधारणा करण्यासाठी वापरला जातो. भारतीय राज्यघटनेनुसार, सरकारला कर गोळा करण्याचा अधिकार आहे आणि आम्ही भरतो ते कर संसदेने किंवा राज्य विधानमंडळाने पारित केलेल्या कायद्यांद्वारे समर्थित आहेत. भारतातील विविध प्रकारच्या करांवर एक नजर टाकूया.

## करांचे वर्गीकरण

सरकार कारच्या स्वरूपात बरेचसे उत्पन्न प्राप्त होते. करआकारणीची तत्वे, करभार, इत्यादी बाबी विचारात घेऊन करांचे पुढील पद्धतीने वर्गीकरण केले जाते.

### (अ) प्रमाणशीर कर आकारणी

या करआकारणीत करदात्याचे उत्पन्न विकारात न घेता निरनिराळ्या उत्पन्न गटातील लोकांकडून एकाच समान दराने कर घेतला जातो. म्हणजेच कराचे शेकडा प्रमाण समान राहते. उत्पन्न पातळीनुसार कराची रक्कम वेगवेगळी राहील. उदाहरणार्थ, १०% दराने प्रमाणशीर आकारणी केल्यास १०००० उत्पन्न असणाऱ्याला १००० कर राहील तर उत्पन्न २५००० असणाऱ्याला २५०० कर भरावा लागेल.

### (आ) पुरोगामी कर आकारणी

जसजसे व्यक्तीचे उत्पन्न वाढत जाते तसतसा कराचा दर वाढविला जाणे म्हणजे पुरोगामी/प्रगतीशील करआकारणी होय.

पुरोगामी करआकारणी क्षमता व न्याय तत्वावर आधारलेली आहे. श्रीमंत वर्गाकडील अधिक असलेला पैसा कररूपाने काढून घेऊन त्यांची श्रीमंती कमी करून जमा झालेल्या उत्पन्नातून समाजातील गरिबांची गरिबी दूर करण्यास मदत होते.

### (इ) प्रतिगामी / अधोगामी करआकारणी

जेव्हा उत्पन्न वाढत असतांना करांचे दर कमी होत जातात तेव्हा अशा करआकारणीस प्रतिगामी करआकारणी असे म्हणतात.

या कर पद्धतीत कमी उत्पन्न असणाऱ्यांवर कराचा दर अधिक असतो तर जास्त उत्पन्न असणाऱ्यांवर कराचा दर कमी असतो. त्यामुळे हि करआकारणी कमी उत्पन्न गटातील लोकांसाठी अन्यायकारक असते.

**खालील तक्त्यात प्रमाणशीर, पुरोगामी व प्रतिगामी करआकारणी मधील फरक स्पष्ट केलेला आहे**

| करआकारणीचा पाया | प्रमाणशीर कर | | प्रगतीशील कर | | प्रतिगामी कर | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्पन्न | कराचा दर | कराची रक्कम | कराचा दर | कराची रक्कम | कराचा दर | कराची रक्कम |
| ५००० | १० % | ५०० | १० % | ५०० | १० % | ५०० |
| १०००० | १० % | १००० | १२ % | १२०० | ८ % | ८०० |
| १५००० | १० % | १५०० | १५ % | २५०० | ७ % | १०५० |
| २०००० | १० % | २००० | २० % | ४००० | ६ % | १२०० |
| २५०००० | १० % | २५०० | ३० % | ७५०० | ५ % | १२५० |
| | | | | | | |

वरील तक्त्यात कराचा दर व कराची रक्कम दाखविलेली आहे. यावरून असे दिसून येते की, ५०० इतके अत्यल्प उत्पन्न असलेल्या गटाला कोणत्याही करआकारणी फायदा होत नाही. पुरोगामी किंवा प्रगतीशील करआकारणी गरिबांना फायदेशीर आहे तर प्रतिगामी करआकारणी अतिश्रीमंत गटातील लोकांना फायदेशीर आहे. प्रगतीशील करआकारणीचा अजून एक फायदा असा कि तेजी किंवा मंदीच्या काळात या कररचनेत बदल करण्याची गरज पडत नाही. त्यात अंगभूत स्थिरके आहेत.

## भारतातील करांचे प्रकार

भारतात दोन प्रकारचे कर आहेत –

## (१) प्रत्यक्ष कर

**व्याख्या**

(१) **जे. एस. मिल :** ज्या व्यक्तीने कर भरावा असे सरकारला वाटते त्याच व्यक्तीकडून घेण्यात येणारा कर म्हणजे प्रत्यक्ष कर होय

(२) ज्या कराचा भार आणि घात एकाच व्यक्तीवर पडतो त्या करास प्रत्यक्ष कर असे म्हणतात.

प्रत्यक्ष कर प्रत्यक्ष कर हे अनेक करांचे मिश्रण आहे, जे आपण थेट सरकारला भरतो. हे कर एखाद्या व्यक्तीवर लादले जातात आणि म्हणून ते दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित केले जाऊ शकत नाहीत. महसूल विभागाच्या अंतर्गत केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ (CBDT) या कराच्या प्रशासनासाठी जबाबदार आहे.

## खाली नमूद केलेल्या प्रत्यक्ष कराचे विविध प्रकार आहेत.

### (अ) वैयक्तिक आयकर /प्राप्तिकर (personal Income Tax)

नागरिकांनी कमावलेल्या उत्पन्नावर लावल्या जाणाऱ्या कराला वैयक्तिक आयकर किंवा प्राप्तिकर असे म्हणतात. भारतीय घटनेतील सातव्या परिशिष्टातील केंद्र सूचीतील विषय क्रमांक ८२ नुसार कृषी उत्पन्न वगळता इतर उत्पन्नावर केंद्र आयकर आकारते. भारतात आयकर आकारण्यात सुरुवात १८६० पासून झाली आयकर कायदा १९६१ या कायद्यानुसार केंद्र सरकार आयकर आकारत असते. या कायद्यानुसार केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (CBDT) आयकर नियम १९६२ तयार केले. आयकर हा सर्व व्यक्तीवर बसवला जात नाही तर व्यक्तींच्या कर भरण्याच्या क्षमतेवर आकारला जातो म्हणून आयकर हा एक प्रगतीशील / पुरोगामी स्वरूपाचा कर आहे. कोणत्याही व्यक्तीने एका वर्षात कमावलेल्या उत्पन्नावर चालू आर्थिक वर्षात कर बसवला जातो.

### (आ) निगमकर (CorporationTax)

कंपन्या, उत्पादन संस्था, महामंडळ, प्रमंडळ यांच्यावरती जो कर आकारला जातो त्याला निगम कर असे म्हणतात. निगम करासाठी आयकर कायदा १९६१ हा लागू आहे. भारतीय कंपन्यांनी संपूर्ण जगात कमावलेल्या उत्पन्नावर तर परदेशी कंपन्यांनी भारतात कमावलेल्या उत्पन्नावर निगम कर आकारला जातो. याशिवाय अधिभार, आरोग्य उपकर, शिक्षण उपकर यासारखे उपकर ही सर्वच कंपन्या व महामंडळांना द्यावे लागतात.

### (इ) संपत्ती कर (Wealth Tax)

व्यक्ती कुटुंबे आणि कंपन्या यांच्या संचित संपत्ती वर हा कर आकारला जातो तो दरवर्षी भरावाच लागतो. संपत्तीवर उत्पन्न मिळत असो किंवा नसो. संपत्ती करा संबंधित कायदा संपत्ती कर कायदा १९५७ असून याचे प्रशासन आयकर विभागाकडून केले जाते. संपत्तीचे मुल्य तीस लाखापेक्षा जास्त झाल्यास या मूल्यावर एक टक्के दराने संपत्ती कर आकारले जात होता. २०१५ १६ च्या अर्थसंकल्प पासून संपत्ती कर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### (ई) मालमत्ता कर /वारसाहक्क कर (Estate Duty)

वारसाहक्काने मिळणाऱ्या संपत्तीवर मालमत्ता कर कायदा १९५३ नुसार हा कर आकारला जात होता. १ एप्रिल १९८५ पासून कर वसुली वरील खर्च जास्त आणि कमी कर या कारणास्तव हा कर आकारणे बंद झाले आहे.

### (उ) देणगी कर/ उपहार कर (Gift Tax)

देणगी कर कायदा १९५८ नुसार देणगी कर आकारला जाई. १ ऑक्टोबर १९९८ पासून ही करआकारणी थांबवण्यात आली.

### (ऊ) व्यवसाय कर (Professional Tax)

राज्य सरकार आकारत असलेला हा कर आहे. व्यवसाय व्यापार आणि रोजगारावर व्यवसाय कर आकारण्याचा अधिकार राज्यांना देण्यात आलेला आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत मासिक साडे सात हजार रुपयांच्या आत उत्पन्न असणाऱ्यांना व्यवसाय कर नाही. साडेसात हजार रुपये ते दहा हजार रुपयापर्यंत मासिक उत्पन्न असणाऱ्यांना वार्षिक एकवीसशे रुपये म्हणजे

प्रतिमा १७५ रुपये तर दहा हजार रुपये पेक्षा जास्त मासिक उत्पन्न असणाऱ्यांना वार्षिक अडीच हजार रुपये (मासिक २०० रुपये) व्यवसाय कर द्यावा लागतो.

**(ऋ) भांडवली नफा**

भांडवल लाभ जो तुम्ही मालमत्तेच्या विक्रीनंतर मिळवलेल्या नफ्यावर लादला जातो. लाभ कराचे दोन प्रकार आहेत– दीर्घकालीन भांडवली लाभ कर आणि अल्पकालीन भांडवली नफा कर. दीर्घकालीन भांडवली नफा दीर्घकालीन भांडवली नफा लादला जातो जेव्हा तुम्ही एक वर्ष किंवा त्याहून अधिक काळासाठी तुमच्या मालकीची एखादी वस्तू विकून नफा मिळवता. दीर्घकालीन भांडवली नफ्यासाठी कराचे दर ०%, १५% आणि २०% आहे. अल्पकालीन भांडवली नफा वैयक्तिक किंवा गुंतवणुकीच्या मालमत्तेच्या विक्री, हस्तांतरण किंवा स्वभावातून अल्पकालीन भांडवली नफा मोजला जातो. एक वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधीसाठी स्टॉक सारख्या गुंतवणुकीची विक्री केली जाते तेव्हा अल्पकालीन भांडवली कर आकारला जातो. शेअर बाजारातील व्यवहारावर व नफ्यावर ३०% कर आकारला जातो.

**प्रत्यक्ष कराचे गुण**

(१) व्यक्तीच्या/कंपनीच्या उत्पादनावर लागतो.

(२) हे कर हस्तांतरित होत नाही. उदा: ळपलेश ींर्ु

(३) ह्याचा कारभार श्रीमंतावर असतो

(४) न्याय प्रस्थापित होतो

(५) श्रीमंता कडून आकारतात व गरिबांवर खर्च करतात

(६) करदात्यामध्ये जागरूकता वाढविणारे असतात.

## (२) अप्रत्यक्ष कर

**व्याख्या**

(१) **जे. एस. मिल :** जे कर एका व्यक्तीने सरकारकडे जमा करावेत व ते त्याने दुसऱ्याकडून वसूल करावे अशी सरकारची इच्छा असते त्या करास अप्रत्यक्ष कर असे म्हणतात.

(२) ज्या कराचा घात आणि भार हा वेगवेगळ्या व्यक्तींवर असतो म्हणजे कर संक्रमण शक्य असते तेव्हा ते कर अप्रत्यक्ष कर असतात

(३) अप्रत्यक्ष करांचा अंतिम करभार ग्राहकावरच पडतो. उदाहरणार्थ, अबकारी कर, सीमाशुल्क, वस्तू व सेवा कर.

**अप्रत्यक्ष करांत खालील करांचा समवेश होतो.**

(१) **अबकारीकर/उत्पादनशुल्क (ExciseTax) :** देशांतर्गत उत्पादन झालेल्या वस्तूवर अबकारी कर आकारण्यात येतो. हा कर उत्पादनावर ती लावला जातो वस्तूची विक्री विचारात घेतली जात नाही. यामध्ये केंद्रीय अबकारी कर आणि राज्य अबकारी कर असे दोन प्रकार आहेत. राज्यांचा अबकारी कर मादक द्रव्य सौंदर्यप्रसाधने अशा उत्पादनावर आकारण्यात येतो इतर अबकारी कर केंद्राद्वारे आकारले जातात.

(२) **सीमा कर / कस्टम ड्युटी (Customs Duty) :** सीमा कराला दुसऱ्या भाषेत जगात असेदेखील म्हटले जाते. आयात व निर्यात मालावरती सीमा कर आकारला जातो. आयात करायला टेरिफ (Tariff) असेही म्हणतात. कस्टम कायदा १९६२ नुसार या कराची कार्यवाही केली जाते.

(३) **विक्रीकर (SalesTax) :** वस्तूंच्या विक्री वरती जो कर लावला जातो त्याला विक्रीकर असे म्हणतात. विक्रीकराचीसुद्धा दोन प्रकार आहेत केंद्रीय विक्री कर आणि राज्यांचा विक्री कर. वस्तूंची विक्री एका राज्यातून दुसऱ्या राज्यात झाल्यास केंद्रीय विक्री कर आकारला जातो. वस्तूची विक्री जर राज्यात झाली असेल तर राज्यांचा विक्री कर आकारला जातो. विक्री कराच्या जागी मूल्यवर्धित कर प्रणाली लागू आहे.

(४) **सेवा कर (Service Tax) :** सेवा कराची आकारणी केंद्रसरकार मगमार्फत केले जाते. वसुली मात्र केंद्र व राज्य सरकारमार्फत होते.

**भारतातील कर रचना कशा पद्धतीची आहे याचा एक मूलभूत भाग या ठिकाणी पाहिला.**

(१) वस्तू व सेवा यांच्या खरेदी व विक्री वर लागणारे कर म्हणजे अप्रतक्ष्य कर

(२) यांचा प्रभाव गरीब आणि श्रीमंत दोघांवर सारखाच होतो

(३) अप्रत्यक्ष्य कराची जागा G.S.T. (GOODS AND SERVICES TAX) ने घेतली

**चांगल्या करपद्धती चे गुणधर्म पुढीलप्रमाणे सांगता येतील.**

(१) कर रचना करताना कराची आकारणी न्याय स्वरूपाची असली पाहिजे म्हणजे उत्पन्नातील योग्य वाटा कर स्वरूपात दिला पाहिजे.

(२) कराची आकारणी व वसुली कार्यक्षम असली पाहिजे. कार्यक्षमता म्हणजे कर महसूल सर्वाधिक असला पाहिजे सोबत या करानेअर्थव्यवस्थेला चालनादेखील मिळाली पाहिजे.

(३) कराचे स्वरूप, मापनपद्धत, वसुली यामध्ये सरलताअसली पाहिजे.

(४) कर रचनामध्ये पारदर्शकता असली पाहिजे. शासन व करदाता यांच्यामध्ये पारदर्शकता असावी.

(५) कराच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने शासनाला योग्य महसूल उपलब्ध करून देण्याची क्षमता करांमध्ये असावी.

(६) कर लवचिक असावा काळानुरूप त्यामध्ये बदल करता आले पाहिजेत.

## वस्तू आणि सेवा कर (Good and Service Tax - GST)

१९८६ मध्ये विश्वनाथ प्रतापसिंह यांनी अप्रत्यक्ष करव्यवस्थेची सुधारणा प्रक्रिया सुरू करून सुधारित मूल्यवर्धित कर (एमओडीव्हीएटी) सुरू केली होती. संपूर्ण देशामध्ये एकसमान (वस्तू व सेवा कर – एक राष्ट्र, एक कर, एक बाजार) अप्रत्यक्ष कर पद्धतीकरिता वस्तु व सेवा कर प्रणालीचा अवलंब करण्याचा निर्णय केंद्र व राज्यशासनांनी एकमताने घेतला. वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणी करिता संविधानात बदल करण्याची आवश्यकता होती. त्यानुसार बदल करण्याचे विधेयक लोकसभेत मांडण्यात आले व लोकसभेने संविधान एकशे बावीसवी सुधारणा विधेयक २०१४ दिनांक ६ मे २०१५ रोजी संमत केले. लोकसभेने पारित केलेले विधेयक संमतीकरिता राज्यसभेकडे पाठविण्यात आले. राज्यसभेने काही बदलासहित वस्तू व सेवा कर विधयेक २०१४ दि. ३ ऑगस्ट २०१६ रोजी पारित केले व बदलासह विधेयक लोकसभेकडे पाठविण्यात आले. बदलांसह विधेयक लोकसभेकडे पाठविण्यात आले व राज्यसभेने सुचवलेले बदल लोकसभेने दि . ८ ऑगस्ट २०१६ रोजी स्वीकृत केले व संविधान सुधारणा विधेयक संमत करण्यात आले. भारतात १ जुलै २०१७ पासून वस्तू व सेवा कर (जीएसटी) हा एकच अप्रत्यक्ष कर लागू करण्यात आला. देशभरात एकसमान करप्रणाली असावी असा उद्देश यामागे होता. त्यानुसार केंद्र आणि राज्य सरकारद्वारे त्यापूर्वी लागू असलेले अनेक अप्रत्यक्ष कर रद्द करून ही करप्रणाली भारतात लागू करण्यात आली. जीएसटी लागू करण्यासाठी भारताच्या राज्यघटनेत १२२ वी घटनादुरुस्ती करून नवीन कायदे करण्यात आले.

'गुड्स न्ड सर्व्हिसेस काउन्सिल' ही मध्यवर्ती वैधानिक संस्था जीएसटीचे नियमन करते. केंद्रीय अर्थमंत्री हे या काउन्सिलचे प्रमुख आहेत.

जीएसटी लागू करण्यासाठी ३० जून २०१७ च्या रात्री संसदेचे विशेष अधिवेशन झाले. त्यात राष्ट्रपतींनी मध्यरात्रीच्या सुमारास जीएसटी लागू झाल्याची अधिकृत घोषणा केली. सर्व वस्तू आणि/ किंवा सेवा यांची विक्री, हस्तांतर, वस्तुविनिमय, भाड्याने देणे किंवा आयात व्यवहारांवर जीएसटी लागू करण्यात येईल. असे प्रसारमाध्यमांतून त्यापूर्वीच स्पष्ट करण्यात आले होते.

जीएसटी अंतर्गत १ जुलै २०१७ पासून ०%, ५%, १२%, १८%, व २८% असे Slab पायऱ्या कर दर ठरविण्यात आले आहेत.

## CGST, SGST आणि IGST म्हणजे काय?

भारत हे एक संघराज्य लोकशाही आहे, याचा अर्थ असा आहे की त्याच्या घटनेत राज्ये आणि केंद्र यांच्यात सत्ता, जबाबदारी आणि महसूल संकलनाबद्दल स्पष्टपणे सीमांकन आहे.

उदाहरणार्थ, कायदा व सुव्यवस्था ही राज्याच्या अखत्यारीत येते, तर देशाचा बचाव ही केंद्राची जबाबदारी आहे. त्याचबरोबर जीएसटीमध्येही अशा स्पष्ट तरतुदी आहेत, जेणेकरून या केंद्र व राज्याबाबत कोणतेही वाद होणार नाहीत आणि दोघेही त्यांच्या पद्धतीने महसूल गोळा करू शकतील.

**CGST (सेंट्रल–जीएसटी) :** यामध्ये केंद्राच्या कर संकलनाचा समावेश होतो.

**SGST (स्टेट जीएसटी) :** यामध्ये कर आकारण्याची जबाबदारी राज्याची असते. यामध्ये केंद्र हस्तक्षेप करत नाही.

**IGST (इंटिग्रेटेड जीएसटी) :** यामध्ये कर संकलन भारतीय संघराज्याच्या अखत्यारीत येते. ते केंद्रीय सरकार गोळा करते; परंतु नंतर ते राज्यांमध्ये हस्तांतरित केले जाते.

भारताची सध्याची कर रचना फारच जटिल आहे. भारतीय राज्यघटनेनुसार वस्तूंच्या विक्रीवर कर लादण्याचा अधिकार आणि वस्तूंच्या उत्पादन व सेवांवर कर आकारण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. यामुळे, देशात विविध प्रकारचे कर लागू आहेत, ज्यामुळे देशातील सध्याची कर प्रणाली अत्यंत जटिल बनली आहे. कंपन्या आणि छोट्या व्यवसायांना वेगवेगळ्या प्रकारच्या कर कायद्याचे पालन करणे अवघड जात आहे. म्हणून GST त्यावरील उपाय आहे, असे सांगितले जाते.
वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) कर, केंद्रीय अबकारी कर, सेवा कर, अतिरिक्त सीमा शुल्क, अधिभार, राज्यस्तरावरील मूल्यवर्धित कर आणि जकात व इतर कर जे सध्याच्या आंतर–राज्य परिवहन वाहतुकीवर लागू आहेत, तेदेखील जीएसटी नियमांत नष्ट होण्याची शक्यता आहे.

### जीएसटीने खालील कर एकत्र केले गेले

- केंद्रीय उत्पादन शुल्क
- व्यवसाय कर
- मूल्यवर्धित कर (त–ढ)
- अन्न कर
- केंद्रीय विक्री कर (सीएसटी)
- करमणूक कर
- प्रवेश कर
- खरेदी कर
- लक्झरी टॅक्स
- जाहिरात कर

विक्री, हस्तांतरण, खरेदी, वस्तुविनिमय, भाडेपट्टी किंवा वस्तू किंवा सेवांच्या आयातीसारख्या सर्व व्यवहारांवर जीएसटी आकारला जाईल. भारत दुहेरी जीएसटी मॉडेल घेईल, म्हणजेच प्रत्येक केंद्र आणि राज्य सरकारांना कराचा वाटा दिला जातो. एका राज्यामध्ये केलेल्या व्यवहारांसाठी केंद्र सरकार आणि राज्य जीएसटी (एसजीएसटी) द्वारा त्या राज्याच्या सरकारद्वारे सेंट्रल जीएसटी (सीजीएसटी)ला लागतील(?). आंतरशालेय (?) व्यवहार आणि आयात केलेल्या वस्तू किंवा सेवांसाठी, केंद्र सरकारद्वारा एकच एकीकृत जीएसटी (आयजीएसटी) लावला जाईल. जीएसटी हा खर्चावर आधारित कर आहे, त्यामुळे ज्या राज्यामध्ये वस्तू किंवा सेवा वापरल्या जात नाहीत त्या राज्यात ज्या उत्पादनांचा उपयोग केला जात नाही अशा राज्यांना कराचा वाटा दिला जातो. आयजीएसटीने केंद्र सरकारकडून थेट करदात्यांकडून कर वसूल करण्यासाठी राज्य सरकारने गुंतागुंतीची करवसुली केली आहे. आधीच्या यंत्रणेनुसार, राज्याला कर महसूल गोळा करण्यासाठी केवळ एका सरकारशी व्यवहार करणे आवश्यक आहे.

## प्रभाव

जीएसटीच्या प्रभावापासून राज्यांना महसूल राखण्याचे आश्वासन दिले आहे, आणि अपेक्षित असे आहे की, पेट्रोलियम व पेट्रोलियम उत्पादनांवर जीएसटी लावला जाईल. केंद्र सरकारने जीएसटीच्या तारखेपासून पाच वर्षांच्या काळात झालेल्या नुकसानाची भरपाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

## कायदे

प्रस्तावित जीएसटी कायद्यानुसार २१ सदस्य असलेल्या समितीची स्थापना करण्यात आली आहे. राज्य आणि केंद्रशासित प्रदेश जीएसटी कायदा जम्मू आणि काश्मीर वगळता भारताच्या सर्व राज्यांद्वारे आणि केंद्रशासित प्रदेशांद्वारे पारित करण्यात आले होते. करसवलत सुलभ करण्यासाठी सिक्युरिटीज विक्री आणि खरेदीवर जीएसटी नसेल. सिक्युरिटीज ट्रॅन्झॅक्शन टॅक्स (एसटीटी) चालू राहील. २०११ साली माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी सर्वात आधी वस्तू व सेवा कराचा प्रस्ताव लोकसभेत सादर केला व २०१७ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात त्याची अंमलबजावणी झाली.

*स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**गाळलेल्या जागा भरा.**

(१) कर ही ----- देणे आहे.
    (अ)आनंददायी (ब) सक्तीचे (क) ऐच्छिक

(२) अप्रत्यक्ष कर ही ------- निर्माण करतात.
    (अ) विषमता (ब) समानता (क) न्याय

(३) GST ----- पासून लागू झाला.
    (अ) २०१४ (ब) २०१७ (क) २०२० (ड) २०२२

## ३.३ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) (ब) सक्तीचे

(२) (अ) विषमता

(३) (ब) २०१७

## ३.४ सारांश

कर हे सक्तीचे देणे असले तरी कर लादत असतांना करभार पात्रता तपासून कर आकारले गेल्यास करांचा भार वाटत नाही. लोकांनी स्वताहून कर जमा करावे अशी करांची रचना हवी. डॉ. डाल्टन असे म्हणतात की, लोकांनी दिलेल्या प्रत्येक रुपयामुळे त्याचे झालेले नुकसान सरकारने केलेल्या सार्वजनिक खर्चाने भरून निघाले पाहिजे तीच सार्वजनिक आय व्ययाची सर्वोत्तम पद्धत आहे.

## ३.५ सरावासाठी स्वाध्याय

(१) वस्तू आणि सेवा कर लागू करण्याचा इतिहास लिहा?

(२) अप्रत्यक्ष कराचे तोटे सांगा?

(३) भारतासारख्या देशांत करचुकवेगिरीला आळा घालण्यसाठी कोणती करआकारणी योग्य राहील? सकारण लिहा.

## ३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) GST, Arun Jetli

(२) सतीश शेवाळकर, GST सर्वांसाठी

(३) प्रा. प्रवीण कामथे, प्रा. मेघना पाटील (मुदिराज), *जी. एस. टी. वस्तू आणि सेवा कर कायदा-एक परिचय*, नागपूर, साई ज्योति पब्लिकेशन

(४) जे. एफ. पाटील, *सार्वजनिक अर्थकारण,* कोल्हापूर, फडके प्रकाशन

(५) दत्त आणि सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था, दिल्ली, एस. चंद पब्लिकेशन

(६) www.gst.gov.in

(७) www.cbic.gov.in

# घटक ४ : भारतातील सेवा कर आकारणी

*अनुक्रमणिका*


४.० उद्दिष्टे
४.१ प्रास्ताविक
४.२ विषय-विवेचन
४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
४.५ सारांश
४.६ सरावासाठी स्वाध्याय
४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- सेवांचा अर्थ समजावून घेणे.
- कराच्या कक्षेत येणाऱ्या सेवांचा अभ्यास करणे.

## ४.१ प्रास्ताविक

### व्याख्या

(१) सेवा म्हणजे अशी क्रिया जी एका व्यक्तीने किंवा संस्थेने दुसऱ्या व्यक्ती किंवा संस्थेसाठी केलेली असते.

(२) प्रत्यक्ष वस्तूची खरेदी विक्री न करताही बरेच अदृश्य वस्तूंची देवाण-घेवाण करतात त्या अदृश्य वस्तूंना सेवा असे म्हणतात.

भारतीय वित्त कायदा १९९४ च्या विभाग ६४ आणि ६५ (१०५) मध्ये करपात्र सेवांची यादी दिलेली आहे. डॉ. राजा चेलीया समितीने कर सुधारणेच्या शिफारशी करतांना सेवा करांची मागणी केली. त्यानुसार १ जुलै १९९४ पासून फक्त ३ सेवांवर (टेलिफोन, शेअर बाजार आणि जनरल विमा) ५% सेवाकर आकारणीस सुरवात झाली. ११ मे २००७ ते २३ फेब्रुवारी २००९ पर्यंत १२% सेवा कराचा दर होता आणि सेवाकरावर २% शिक्षण अधिभार व १% शालेय शिक्षण अधिभार असा १२.३६% सेवाकर ग्राहकाला भरावा लागत होता. उदाहरणार्थ, १००० रु. टेलिफोन बिल असल्यास १२% सेवाकर = १२० रु. व १२० रु. २% शिक्षण अधिभार = रु. २.४० व १% शालेय शिक्षण अधिभार = रु. १.२० असे एकूण रु. १२३.६० द्यावे लागतील.

## ४.२ विषय-विवेचन

ज्या सेवांपासून उत्पन्न मिळते अशा सेवांवर सेवा कराची आकारणी केली जाते. १ मे २०११ नुसार भारतात ११९ सेवा या कराच्या कक्षेत होत्या. यात जाहिरात, विमान सेवा, बँकिंग, CA, CS, डिझाईन, फोटोग्राफी, हॉटेल, पब, गेस्ट हाउस, क्लब, IPR, कायदेशीर सल्ला, सहल नियोजक, सुरक्षा एजन्सी, वसुली एजंट, रिअल इस्टेट एजंट, जहाज व्यवस्थापक, इत्यादी सेवांचा समावेश होतो.

सन २०१२ च्या बजेटमध्ये सेवाकर लागू असलेल्या सेवांच्या ऐवजी सेवाकर लागू नसलेली यादी जाहीर करण्यात आली. त्यास नकारात्मक यादी (Negative List) असे म्हणतात. २०१२ च्या अर्थसंकल्पात एकूण १७ सेवांना नकारात्मक यादीत समाविष्ट करण्यात आले. २०१३ ला त्यात वाढ करून ३८ इतकी करण्यात आली.

**सेवाकराचा विस्तार व सेवाकरापासून प्राप्त महसूल**

| आर्थिक वर्ष | समाविष्ठ सेवांची संख्या | महसूल (कोटी रु.) |
|---|---|---|
| १९९४-९५ | ३ | ४०७ |
| १९९५-९६ | ६ | ८६२ |
| १९९६-९७ | ६ | १०५९ |
| १९९७-९८ | १८ | १५८६ |
| १९९८-९९ | २६ | १९५७ |
| १९९९-२००० | २६ | २१२८ |
| २०००-०१ | २६ | २६१३ |
| २००१-०२ | ४१ | ३३०२ |
| २००२-०३ | ५२ | ४१२२ |
| २००३-०४ | ६२ | ७८९१ |
| २००४-०५ | ७५ | १४२०० |
| २००५-०६ | ८४ | २३०५५ |
| २००६-०७ | ९९ | ३७५९८ |
| २००७-०८ | १०० | ५१३०१ |
| २००८-०९ | १०६ | ६०९४१ |
| २००९-१० | १०९ | ५८४२२ |
| २०१०-११ | ११७ | ७१०१६ |
| २००११-१२ | ११९ | ९७५०९ |
| २०१२-१३ | नकारात्मक यादी | १३२५१८ |

(Source: www.cbic.gov.in)

## सेवा कराचा दर आणि अधिभार

| कालावधी | सेवा कराचा दर | अधिभार | | एकूण सेवाकर दर |
|---|---|---|---|---|
| | | शिक्षण | शालेय शिक्षण | |
| १ जुलै १९९४ ते १३ मे २००३ | ५% | निरंक | निरंक | ५% |
| १४ मे २००३ ते ९ नोव्हेबर २००४ | ८% | निरंक | निरंक | ८% |
| १० नोव्हेबर २००४ ते १७ एप्रिल २००६ | १०% | २% | निरंक | १०.२०% |
| १८ एप्रिल २००६ ते ३१ मे २००७ | १२% | २% | निरंक | १२.२४% |
| १ जून २००७ ते २३ फेब्रुवारी २००९ | १२% | २% | १% | १२.३६% |
| २४ फेब्रुवारी २००९ ते ३१ मार्च २०१२ | १०% | २% | १% | १०.३०% |
| १ एप्रिल २०१२ ते ३१ मे २०१५ | १२% | २% | १% | १२.३६% |
| १ जून २०१५ ते १४ नोव्हेबर २०१५ | १४% | | | १४% |
| १५ नोव्हेंबर २०१५ ते ३१ मे २०१६ | १४% | ०.५०% (स्वच्छ भारत) | | १४.५% |
| १ जून २०१६ ते ३० जून २०१७ | १४% | ०.५०% (स्वच्छ भारत) | ०.५०% १५% (कृषी कल्याण) | |

(Source: www.cbic.gov.in)

### सेवा करात समाविष्ट असलेल्या सेवा

(०१) जाहिरात
(०२) हवाई प्रवासी एजंट
(०३) विमानतळ सेवा
(०४) वास्तुविशारद
(०५) एटीएम ऑपरेशन्स, व्यवस्थापन किंवा देखभाल
(०६) लिलाव करणार्यांची सेवा, केंद्र सरकारच्या निर्देशानुसार किंवा मोजणी किंवा लिलावाच्या आदेशानुसार मालमत्तेचा लिलाव करण्याव्यतिरिक्त.
(०७) अधिकृत सर्व्हिस स्टेशन
(०८) सामान्य विम्यासाठी सहायक
(०९) जीवन विम्यासाठी सहायक
(१०) बँकिंग आणि इतर आर्थिक सेवा
(११) सौंदर्य प्रसाधन केंद्र
(१२) प्रसारण
(१३) व्यवसाय सहाय्यक सेवा
(१४) व्यवसाय प्रदर्शन सेवा
(१५) व्यवसाय समर्थन सेवा
(१६) केबल ऑपरेटर
(१७) कार्गो हाताळणी
(१८) सनदी लेखापाल
(१९) स्वच्छता सेवा
(२०) क्लिअरिंग आणि फॉरवर्डिंग एजंट
(२१) क्लब आणि संघटना
(२२) व्यावसायिक किंवा औद्योगिक बांधकाम
(२३) व्यावसायिक प्रशिक्षण किंवा कोचिंग
(२४) कंपनी सचिव
(२५) निवासी संकुलाचे बांधकाम
(२६) सल्लागार अभियंता
(२७) कन्व्हेन्शन सेंटर
(२८) खर्च लेखापाल
(२९) कुरिअर सेवा
(३०) क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, चार्ज कार्ड किंवा इतर पेमेंट कार्ड संबंधित सेवा
(३१) क्रेडिट रेटिंग एजन्सी
(३२) कस्टम हाउस एजंट
(३३) ड्रेजिंग

(३४) कोरडे स्वच्छता
(३५) उभारणी, कमिशनिंग किंवा इन्स्टॉलेशन
(३६) इव्हेंट मॅनेजमेंट
(३७) फॅशन डिझायनर
(३८) फॉरवर्ड कॉन्ट्रॅक्ट सर्व्हिसेस
(३९) फ्रँचायझी सेवा
(४०) परकीय चलन दलाल
(४१) सामान्य विमा
(४२) हेल्थ क्लब आणि फिटनेस सेंटर
(४३) बौद्धिक संपदा सेवा
(४४) अंतर्गत सजावटकार
(४५) इंटरनेट कॅफे
(४६) इंटरनेट दूरसंचार सेवा
(४७) जीवन विमा
(४८) मेलिंग लिस्ट संकलन आणि मेलिंग
(४९) व्यवस्थापन सल्लागार
(५०) देखभाल किंवा दुरुस्ती सेवा
(५१) मंडप रक्षक
(५२) मनुष्यबळ भरती किंवा पुरवठा संस्था
(५३) मार्केट रिसर्च एजन्सी
(५४) ऑनलाइन माहिती आणि डेटाबेस प्रवेश किंवा पुनर्प्राप्ती सेवा
(५५) ओपिनियन पोल सेवा
(५६) आउटडोअर केटरर
(५७) पॅकेजिंग सेवा
(५८) पंडाल किंवा शामियाना सेवा
(५९) छायाचित्रण
(६०) बंदर सेवा (प्रमुख बंदरे)
(६१) बंदर सेवा (इतर बंदरे)
(६२) जनसंपर्क सेवा
(६३) रेल्वे ट्रॅव्हल एजंट
(६४) रिअल इस्टेट एजंट / सल्लागार
(६५) पुनर्प्राप्ती एजंट
(६६) एका समस्येचे रजिस्ट्रार
(६७) भाडे - र - कॅब ऑपरेटर
(६८) छापील माध्यमांव्यतिरिक्त जाहिरातीसाठी जागा किंवा वेळेची विक्री
(६९) वैज्ञानिक किंवा तांत्रिक सल्लामसलत
(७०) सुरक्षा एजन्सी
(७१) शेअर ट्रान्सफर एजंट
(७२) जहाज व्यवस्थापन सेवा
(७३) साइटची तयारी
(७४) ध्वनी रेकॉर्डिंग
(७५) स्पोर्ट्स इव्हेंटच्या प्रायोजकत्वाव्यतिरिक्त कोणत्याही संस्थेला किंवा कंपनीला प्रायोजकत्व सेवा प्रदान केली जाते
(७६) स्टीमर एजंट
(७७) स्टॉक ब्रोकर
(७८) स्टोरेज आणि वेअरहाउसिंग
(७९) खनिजांचे सर्वेक्षण आणि अन्वेषण
(८०) सर्वेक्षण आणि नकाशा तयार करणे
(८१) ढ.त. आणि रेडिओ कार्यक्रम उत्पादन सेवा
(८२) तांत्रिक चाचणी आणि विश्लेषण
(८३) तांत्रिक तपासणी आणि प्रमाणन एजन्सी
(८४) टूर ऑपरेटर
(८५) विमानाने मालाची वाहतूक
(८६) रस्त्याने मालाची वाहतूक
(८७) रेल्वेने कंटेनरमध्ये मालाची वाहतूक
(८८) पाण्याव्यतिरिक्त इतर मालाची वाहतूक, पाईपलाईन किंवा इतर नालीद्वारे
(८९) इकॉनॉमी क्लासच्या प्रवाशांव्यतिरिक्त विमानाने आंतरराष्ट्रीय प्रवासाला निघालेल्या प्रवाशांची वाहतूक
(९०) समुद्रपर्यटन जहाजाद्वारे व्यक्तींची वाहतूक
(९१) हवाई आणि रेल्वे प्रवासाव्यतिरिक्त ट्रॅव्हल एजंट
(९२) अंडररायटर
(९३) व्हिडिओ टेप उत्पादन
(९४) दूरसंचार
(९५) स्थावर मालमत्ता भाड्याने देणे
(९६) कामाचा करार
(९७) सामग्री विकास आणि पुरवठा
(९८) मालमत्ता व्यवस्थापन
(९९) खाण सेवा (तेल आणि वायू)
(१००) डिझाइन सेवा
(१०१) माहिती तंत्रज्ञान सॉफ्टवेअर सेवा
(१०२) युलिपसाठी गुंतवणूक व्यवस्थापन
(१०३) मान्यताप्राप्त स्टॉक एक्सचेंज
(१०४) मान्यताप्राप्त संघटना-कमोडिटी एक्सचेंज सेवा
(१०५) क्लिअरिंग आणि प्रोसेसिंग हाउस सेवा
(१०६) मूर्त वस्तू सेवांचा पुरवठा
(१०७) कॉस्मेटिक किंवा प्लास्टिक सर्जरी सेवा

(१०८) तटीय मालाची वाहतूक, राष्ट्रीय जलमार्गाद्वारे माल किंवा अंतर्देशीय जलमार्गाद्वारे माल

(१०९) कायदेशीर सल्लागार सेवा

(११०) लॉटरी, बिंगो इत्यादी सेवांसह संधीच्या खेळांचा प्रचार, विपणन किंवा आयोजन

(१११) रुग्णालये किंवा वैद्यकीय आस्थापनांनी हाती घेतलेल्या आरोग्य सेवा

(११२) वैद्यकीय नोंदी सेवांची देखभाल

(११३) वस्तू, सेवा इत्यादींच्या ब्रँडची जाहिरात.

(११४) कोणत्याही कार्यक्रमाचा व्यावसायिक वापर किंवा शोषण करण्याची परवानगी देणारी सेवा

(११५) विद्युत विनिमय सेवा

(११६) कॉपीराइट सेवा

(११७) प्राधान्य स्थान, अंतर्गत/बाह्य विकास इत्यादींच्या संबंधात बिल्डरद्वारे प्रदान केलेल्या सेवा

(११८) अन्न किंवा शीतपेयांच्या सेवेच्या संबंधात अल्कोहोलयुक्त पेये सेवा देण्याचा परवाना असलेल्या वातानुकूलित रेस्टॉरंटच्या सेवा.

(११९) तीन महिन्यांपेक्षा कमी कालावधीसाठी हॉटेल्स / सराय / शावक / अतिथी घरे / शिबिराच्या ठिकाणी निवास प्रदान करण्याच्या सेवा

**सेवाकरात समाविष्ट सेवांची यादी आणि सेवा समाविष्ट तारीख**

| | | |
|---|---|---|
| (01) | Advertising | 01.11.1996 |
| (02) | Air Travel Agent | 01.07.1997 |
| (03) | Airport Services | 10.09.2004 |
| (04) | Architect | 16.10.1998 |
| (05) | ATM² Operations, Management or Maintenance | 01.05.2006 |
| (06) | Auctioneers' service, other than auction of property under directions or orders of a count of or auction by Central Govt. | 01.05.2006 |
| (07) | Authorized Service Station | 16.07.2001 |
| (08) | Auxiliary to General Insurance | 16.07.2001 |
| (09) | Auxiliary to Life Insurance | 16.08.2002 |
| (10) | Banking Other Financial Services | 16.07.2001 |
| (11) | Beauty Parlor | 16.08.2002 |
| (12) | Broadcasting | 16.07.2001 |
| (13) | Business Auxiliary Service | 01.07.2003 |
| (14) | Business Exhibition Service | 10.09.2004 |
| (15) | Business Support Service | 01.05.2006 |
| (16) | Cable Operator | 16.08.2002 |
| (17) | Cargo Handling | 16.08.2002 |
| (18) | Chartered Accountant | 16.10.1998 |
| (19) | Cleaning Service | 16.06.2005 |
| (20) | Clearing Forwarding Agent | 16.07.1997 |
| (21) | Clubs and Associations | 16.06.2005 |
| (22) | Commercial or Industrial Construction | 10.09.2004 |
| (23) | Commercial Training or Coaching | 01.07.2003 |
| (24) | Company Secretary | 16.10.1998 |
| (25) | Construction of Residential Complex | 16.06.2005 |
| (26) | Consulting Engineer | 07.07.1997 |
| (27) | Convention Centre | 16.07.2001 |
| (28) | Cost Accountant | 16.10.1998 |

| | | |
|---|---|---|
| (29) | Courier Services | 01.11.1996 |
| (30) | Credit Card, Debit Card, Charge Card or other payment card related services 01.05.2006 | |
| (31) | Credit Rating Agency | 16.10.1998 |
| (32) | Custom House Agent | 15.06.1997 |
| (33) | Dredging | 16.06.2005 |
| (34) | Dry Cleaning | 16.08.2002 |
| (35) | Erection, Commissioning or Installation | 01.07.2003 |
| (36) | Event Management | 16.08.2002 |
| (37) | Fashion Designer | 16.08.2002 |
| (38) | Forward Contract Services | 10.09.2004 |
| (39) | Franchise Service | 01.07.2003 |
| (40) | Foreign Exchange Broker | 01.07.2003 |
| (41) | General Insurance | 01.07.1994 |
| (42) | Health Club Fitness Centre | 16.08.2002 |
| (43) | Intellectual Property Service | 10.09.2004 |
| (44) | Interior Decorator | 16.10.1998 |
| (45) | Internet Caf | 01.07.2003 |
| (46) | Internet Telecommunication Service | 01.05.2006 |
| (47) | Life Insurance | 16.08.2002 |
| (48) | Mailing List Compilation and Mailing | 16.06.2005 |
| (49) | Management Consultant | 01.07.1997 |
| (50) | Maintenance or Repair Service | 01.07.2003 |
| (51) | Mandap Keeper | 16.10.1998 |
| (52) | Manpower Recruitment or Supply Agency | 07.07.1997 |
| (53) | Market Research Agency | 16.10.1998 |
| (54) | On-line Information Database Access or Retrieval Service | 16.07.2001 |
| (55) | Opinion Poll Service | 10.19.2004 |
| (56) | Outdoor Caterer | 10.09.2004 |
| (57) | Packaging Service | 16.06.2005 |
| (58) | Pandal or Shamiana Services | 10.09.2004 |
| (59) | Photography | 16.07.2001 |
| (60) | Port Service (Major Ports) | 16.07.2001 |
| (61) | Port Services (Other Ports) | 01.07.2003 |
| (62) | Public Relations Service | 01.05.2006 |
| (63) | Rail Travel Agent | 16.08.2002 |
| (64) | Real Estate Agent / Consultant | 16.10.1998 |
| (65) | Recovery Agent | 01.05.2006 |
| (66) | Registrar to an Issue | 01.05.2006 |
| (67) | Rent - a - Cab Operator | 16.07.1997 |
| (68) | Sale of space or time for Advertisement, other than print media | 01.05.2006 |

| | | |
|---|---|---|
| (69) | Scientific or Technical Consultancy | 16.07.2001 |
| (70) | Security Agency | 16.10.1998 |
| (71) | Share Transfer Agent | 01.05.2006 |
| (72) | Ship Management service | 01.05.2006 |
| (73) | Site Preparation | 16.06.2005 |
| (74) | Sound Recording | 16.07.2001 |
| (75) | Sponsorship service provided to any body corporate or firm, other than sponsorship of sports event | 01.05.2006 |
| (76) | Steamer Agent | 15.06.1997 |
| (77) | Stock Broker | 01.07.1994 |
| (78) | Storage Warehousing | 16.08.2002 |
| (79) | Survey Exploration of Minerals | 10.09.2004 |
| (80) | Survey and Map Making | 16.06.2005 |
| (81) | T.V. radio Programme Production Services | 10.09.2004 |
| (82) | Technical Testing Analysis | 01.07.2003 |
| (83) | Technical Inspection Certification Agency | 01.07.2003 |
| (84) | Tour Operator | 01.09.1997 |
| (85) | Transport of goods by Air | 10.09.2004 |
| (86) | Transport of goods by Road | 01.01.2005 |
| (87) | Transport of goods in containers by rail 'other than Indian railway' omitted w.e.f. 01.09.2009 | 01.05.2006 |
| (88) | Transport of goods other than water, through Pipeline or other conduit | 16.06.2005 |
| (89) | Transport of passengers embarking on international journey by air, other than economy class passengers | 01.05.2006 |
| (90) | Transport of persons by cruise ship | 01.05.2006 |
| (91) | Travel -gent other than -ir Rail Travel | 10.09.2004 |
| (92) | Underwriter | 16.10.1998 |
| (93) | Video Tape Production | 16.07.2001 |
| (94) | Telecommunication | 01.06.2007 |
| (95) | Renting of immovable property | 01.06.2007 |
| (96) | Works contract | 01.06.2007 |
| (97) | Content Development Supply | 01.06.2007 |
| (98) | -sset Management | 01.06.2007 |
| (99) | Mining Services( Oil Gas) | 01.06.2006 |
| (100) | Design Services | 01.06.2007 |
| (101) | Information Technology Software services | 16.05.2008 |
| (102) | Investment Management for ULIP | 16.05.2008 |
| (103) | Recognized Stock Exchange | 16.05.2008 |
| (104) | Recognized -ssociations-Commodity Exchange Services | 16.05.2008 |
| (105) | Clearing Processing House services | 16.05.2008 |
| (106) | Supply of Tangible Goods services | 16.05.2008 |

| | | |
|---|---|---|
| (107) | Cosmetic or Plastic Surgery Services | 01.09.2009 |
| (108) | Transport of Coastal goods, Goods through National Waterways or Goods through Inland Waterways | 01.09.2009 |
| (109) | Legal Consultancy Services | 01.09.2009 |
| (110) | Promotion, marketing or organizing of games of chance including lottery, bingo etc. services | 01.07.2010 |
| (111) | Health services undertaken by Hospitals or Medical establishments | 01.07.2010 |
| (112) | Maintenance of Medical Records services | 01.07.2010 |
| (113) | Promotion of Brand of Goods, Services etc. | 01.07.2010 |
| (114) | Services of Permitting Commercial Use or Exploitation of any event | 01.07.2010 |
| (115) | Electricity Exchange Services | 01.07.2010 |
| (116) | Copyright Services | 01.07.2010 |
| (117) | Services provided by Builder in relation to preferential location, internal/external development etc | 01.07.2010 |
| (118) | Services of Air-conditioned restaurants having license to service alcoholic beverages in relation to service of food or beverages. | 1.5.2011 |
| (119) | Services of providing of accommodation in hotels / inns/ cubs/ guest houses/ campsite for a continuous period of less than three months | 1.5.2011 |

(Source: www.cbic.gov.in)

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**गाळलेल्या जागा भरा.**

(१) भारतात -------- पासून सेवा कराला सुरवात झाली.

(अ) १९९४ (ब) १९९० (क) २०१४ (ड)२०१७

(२) ------ समितीच्या शिफारशी नुसार सेवा कराची अंमलबजावणी करण्यात आली.

(अ) नरसिहम (ब) राजा चेलीया (क) हशीम

(३) सेवा कराची जागा आता ------ घेतली आहे.

(अ) VAT (ब) GST (क) उत्पन्न कर

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **कर सुधारणा समिती :** कररचनेत सुधारणा करण्यासाठी एक अभ्यासगट तयार करून त्याच्या अभ्यासाच्यातून काही शिफारशी सुचविल्या जातात. त्या शिफारशींचा आधार घेऊन सरकार करआकारणीत बदल करता. या समितींना त्यांच्या अध्यक्षांच्या नावाने ओळखले जाते. उदाहरणार्थ, राजा चेलीया समिती, विजय केळकर समिती, इत्यादी.
- **सकारात्मक व नकारात्मक यादी :** नकारत्मक यादी याचा अर्थ असा की, करआकारणीत लागू नसलेल्या सेवांची यादी

व सकारात्मक यादी म्हणजे करआकारणी लागू असलेल्या सेवांची यादी. सकारात्मक शब्द हा समावेश या अर्थाने वापरला जातो. ज्या वेळी समाविष्ट यादी खूप मोठी होते त्यावेळी नकारात्मक यादी वापरली जाते. जेणेकरून वर्गीकरण करणे सोपे जाईल.

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) (अ) १९९४

(२) (ब) राजा चेलीया

(३) (क्ब) GST

## ४.५ सारांश

सेवांवर करआकारणी केल्याने करांचा पाया वाढत गेला आहे. सेवाकरावर अधिभार आकारला गेल्याने अधिभाराचे वाटप राज्याराज्यात केले जात नसल्याने विशिष्ट हेतूसाठी केंद्र सरकारकडे महसूल जमा होतो. सेवा कराच्या ठिकाणी वस्तू व सेवा कर (GST) लागू झाल्याने सर्व सेवांवर ५%, १२%, १८% व २८% दराने अशा ४ प्रकारे आकारला जातो. रेल्वे, AC कार, वर्तमानपत्र, इत्यादी. निवडक सेवांवर ५%, इकॉनॉमी क्लास चा विमान प्रवास, IPR, चीट फंड, सहल आयोजन, इत्यादी. साठी १२%, खाद्यान्न, पेये, हॉटेल राहणे, सर्कस, सिनेमा तिकीट, अशा बहुसंख्य सेवांवर १८%, क्लब, गेम, ५ स्टार हॉटेल, इत्यादी. उच्चभ्रु सेवांवर २८% दराने GST आकारणी केली जाते.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

(१) सेवा कर म्हणजे काय? सविस्तर चर्चा करा?

(२) सेवा कर लागू असलेल्या सेवांची थोडक्यात माहिती लिहा?

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) GST, Arun Jetli

(२) GST सर्वांसाठी (लेखक - सतीश शेवाळकर)

(३) (३) प्रा. प्रवीण कामथे, प्रा. मेघना पाटील (मुदिराज), *जी. एस. टी. वस्तू आणि सेवा कर कायदा-एक परिचय*, नागपूर, साई ज्योति पब्लिकेशन

(४) जे. एफ. पाटील, *सार्वजनिक अर्थकारण,* कोल्हापूर, फडके प्रकाशन

(५) दत्त आणि सुंदरम, भारतीय अर्थव्यवस्था, दिल्ली, एस. चंद पब्लिकेशन

(६) www.gst.gov.in

(७) www.cbic.gov.in

# घटक ५ : सामाजिक क्षेत्रावरील खर्च

*अनुक्रमणिका*


५.0 उद्दिष्टे
५.१ प्रास्ताविक
५.२ विषय-विवेचन
५.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
५.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
५.५ सारांश
५.६ सरावासाठी स्वाध्याय
५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ५.0 उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- सामाजिक क्षेत्रातील सेवांची माहिती करून घेणे.
- कल्याणकारी योजना व सामाजिक सेवांवर होणारा खर्च यांचा परस्पर सबंध अभ्यसणे.

## ५.१ प्रास्ताविक

कल्याणकारी राज्याची संकल्पना विकारल्याने सरकारच्या कार्यात मोठी वाढ झालेली दिसून येते. सार्वजनिक सेवांवर केला जाणारा खर्च हा कल्याणकारी असल्याचे अनेक अभ्यासांवरून स्पष्ट झाले आहे. कोणते राष्ट्र किती कल्याणकारी आहे हे तपासण्यासाठी त्या राष्ट्राचा सार्वजनीक बाबीवर होणारा खर्च किती यावरु स्पष्ट होते. सार्वजनिक क्षेत्रांवर होणारा खर्च ही कल्याणाची मोजपट्टी आहे. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, व्यवसाय किंवा सेवा या नफा मिळविण्यासाठी नसून सर्वसामान्य जनतेला काही लाभदायक सेवा सहज उपलब्ध व्हाव्यात हा उद्देश असतो.

## ५.२ विषय-विवेचन

सर्वसामान्य लोकांना काही अत्यावश्यक सेवा खुल्या बाजारातून विकत घेता येणे शक्य नसते. म्हणजेच बाजार व्यवस्था अशा समाजास या वस्तूंच्या वापरापासून वंचित ठेवते त्या वस्तू किंवा सेवा वेगवेगळ्या प्रणाली मार्फत या वस्तू व सेवा जे खरेदी करू शकत नाही त्यांना पुरविणे हा याचा महत्वाचा हेतू आहे. सार्वजनिक उद्योग उदाहरणार्थ, रेल्वे, पोस्ट, बँका, जीवन विमा निगम, इत्यादीमुळे ज्या सेवा सर्वसामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेरील होत्या त्या अशा उद्योगामार्फत नागरिकांना उपभोगता येतात.

## सार्वजनिक योजनामध्ये समाविष्ट बाबी व त्यावरील खर्च

Composition of Expenditure on Social Services
(Revenue and Capital Accounts)
(Per cent to total expenditure on social services)

| Item | 1990-98 Average | 1998-2004 | 2004-08 | 2008-10 | 2010-14 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| Expenditure on Social Services (a to k) | 100.0 | 100.0 | 100.0 | 100.0 | 100.0 |
| (a) Education, Sports, -rt and Culture | 51.9 | 52.6 | 47.3 | 44.3 | 46.9 |
| (b) Medical, public Health and Family Welfare | 15.7 | 14.2 | 12.9 | 12.0 | 12.3 |
| (c) Water Supply and Sanitation | 7.3 | 7.6 | 8.2 | 6.7 | 4.6 |
| (d) Housing | 2.9 | 2.9 | 2.9 | 3.1 | 2.9 |
| (e) Urban Development | 2.4 | 3.2 | 5.4 | 8.7 | 7.3 |
| (f) Welfare of SCs, ST and OBCS | 6.6 | 6.3 | 7.0 | 6.9 | 7.5 |
| (g) Labour and Labour Welfare | 1.4 | 1.1 | 1.1 | 1.0 | 1.1 |
| (h) Social Security and Welfare | 4.4 | 4.7 | 6.5 | 9.4 | 10.3 |
| (i) Nutrition | 2.2 | 2.2 | 2.5 | 3.1 | 3.3 |
| (j) Expenditure on Natural Calamities | 2.8 | 3.3 | 4.0 | 2.7 | 2.1 |
| (k) Others | 2.4 | 2.0 | 2.2 | 2.2 | 2.0 |

Source: governments' budget documents.

भारतातील काही सार्वजनिक सेवा व त्यांवरील खर्चाची प्रवृत्ती यांचा आढावा घेतल्यानंतर आपल्या अनेक बाबी स्पष्ट करता येईल. आर्थिक पाहणी अहवालाची आकडेवारी असे दर्शविते कि, २०२१-२२ मध्ये ७१.६१ लाख कोटी रु. GDP च्या ८.६% सार्वजनिक सेवांवर खर्च करण्यात आले. तर २०२०-२१ मध्ये ५४००० कोटी रु. GDP ८.३ % इतका होता.

## सार्वजनिक सेवा

(१) **शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती :** शिक्षण हा मुलभूत अधिकार आहे. तो शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी शैक्षणिक चळवळी झाल्या. भारत सरकारने सर्व शिक्षा अभियानाच्या अंतर्गत मोफत व सक्तीचे शिक्षण सुरू केले. तसेच सर्व शाळामध्ये पिण्याचे पाणी व स्वच्छतेच्या बाबतीत जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन या योजना सर्व शिक्षा योजनेबरोबर राबविण्यात आल्या. जाने. २०२२ पर्यंत देशातील ८,३९,४४३ शाळांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला. सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात जल जीवन मिशन योजनेसाठी ६०००० कोटी रु. इतकी तरतूद करण्यात आली.

क्रीडा, कला व संस्कृती या क्षेत्रात भरीव योगदान करण्यासाठी विशेष अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात येते. त्यामुळे जागतिक पातळीवर याचा लाभ व प्रतिनिधित्व वाढत असल्याचे दिसून येते. सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात शिक्षणासाठी १०४२७८ कोटी रु. इतकी तरतूद करण्यात आली.

(२) **औषधे, आरोग्य आणि कुटुंब कल्याण :** आरोग्याच्या बाबतीत अतिरिक्त लोकसंख्या हा अडसर ठरत आहे. त्यामुळे या गोष्टींवर खुप ताण पडत. साथीच्या रोगांचे निर्मुलन करण्यसाठी योजना काळात ग्रामीण व शहरी भागात सार्वजनिक दवाखा न्यांची सोय करण्यात आली. आज देशांत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मार्फत कोव्हीड १९ कालावधीतदेखील सुविधा पुरविल्या. सन २०२२-२३च्या अंदाजपत्रकात आरोग्य सेवांसाठी ८६२००.६५ कोटी रु. इतकी तरतूद करण्यात आली.

(३) **घरकुल :** सर्वांना हकाचे घर मिळावे यासाठी इंदिरा आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना सुरू करण्यात आल्या.

(४) **नागरी विकास :** रस्ते, विमानतळ, रेल्वे, इत्यादी नागरी सुखसोईमध्ये वाढ झाल्यामुळे नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावला.

(५) **SC, ST व OBC कल्याण :** समजातील मागासलेल्या वर्गाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मागासवर्ग आयोगाची स्थापना करण्यात आली असून यासाठी स्वतंत्र अंदाजपत्रकीय तरतूद केली जाते. शिक्षण, रोजगार, इत्यादीमध्ये SC, ST, OBC साठी राखीव जागा निर्माण करून त्यांना शिष्यवृत्ती, उद्योग सुरू करण्यासाठी सोई सुविधा, इत्यादी योजना राबवून त्यांचे राहणीमान वाढविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहे.

(६) **सामाजिक सुरक्षितता आणि कल्याण :** समाजातील जनतेला निवृत्तीनंतर सुखी समाधानी जीवन जगता यावे यासाठी सरकारमार्फत पेन्शन, विमा, अशा योजना सुरू करण्यात आलेल्या आहे. तसेच कल्याणकारी राज्याची संकल्पना व लोकांच्या कल्याणासाठी बेरोजगार भत्ता, कुटुंब कल्याण योजना, इत्यादी कौटुंबिक योजना सुरू करून लोकांच्या राहणीमान वाढविण्यासाठी केल्या जाणाऱ्या खर्चात वाढ होत आहे.

(७) **अन्नधान्य :** देशांतील जनतेला अन्नधान्य उपलब्ध करून देणे हि जबाबदारी सरकारने उचलली आहे. अन्न संकटाचा सामना भारताने केलेला आहे. व PL ४८० करारांतर्गत आपण धान्य दुसऱ्या देशांकडून घेतले आहे. आज भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे. त्यामुळे आता सरकारने वितरण प्रणालीवर लक्ष करून सार्वजिनक वितरण व्यवस्था भक्कम करण्यावर अधिक भर दिला आहे. BPL परिवारांना २ रु. किलो दराने गहू व ३ रु. किलो दराने तांदूळ उपलब्ध करून दिला जातो. कोव्हीड १९ च्या काळात देशातील सर्व कुटुंबांना मोफत अन्नधान्याचे वाटप करण्यात आले व या योजनेला डिसेंबर २०२३ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली आहे.

(८) **पर्यावरण संरक्षण :** जागतिक पातळीवर पर्यावरणाच्या बाबतीत गंभीर परिस्थिती आहे. त्यामुळे याबातीत जगातील नियमानुसार भारतातील नियम असणे गरजेचे आहे. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी वाहनांच्या बाबतीत BS VI लागू करण्याच्या दिशेने कठोर पावले उचलली. तसेच जल, जमीन, वायू प्रदूषण रोखण्यासाठी कडक कायदे करण्यात येत आहे. गंगा शुद्धीकरण प्रकल्प, वनक्षेत्र वाढविणे, इत्यादी कामांवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जात आहे. अपारंपरिक उर्जा स्त्रोत वाढवून प्रदूषण कमी करणे याकडे अधिक लक्ष दिले जात आहे.

(९) **ग्रामीण विकास :** ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी मुख्य शहराशी ग्रामीण भाग जोडला जाने गरजेचा आहे. त्यासाठी रस्ते, वीज, पाणी, इंटरनेट, इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना सुरू करण्यात आली असून सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात त्यासाठी १९०० कोटी रु. इतकी तरतूद करण्यात आली

### योजना काळातील सामाजिक सुविधांवर झालेला खर्च

**Pattern of Plan Outlay on Social Services**

(Rs. billion)

| Period | Outlay | Actuals |
|---|---|---|
| Sixth Plan 1981-85 | 140.35 | 159.17 |
| | (14.4) | (14.5) |
| Seventh Plan 1985-1990 | 315.45 | 349.60 |
| | (17.5) | (16.0) |
| Eighth Plan 1992-97 | 790.12 | 888.07 |
| | (18.2) | (18.3) |
| Ninth Plan 1997-2002 | 1,832.73 | 1,945.29 |
| | (21.3) | (20.6) |
| Tenth Plan 2002-2007 | 3,473.91 | 4,365.29 |
| | (22.8) | (27.0) |
| Eleventh Plan 2007-12 | 11,023.27 | 11,975.76 |
| | (30.2) | (32.6) |
| Twelfth Plan 2012-17 | 26,648.43 | |
| | (34.7) | |
| Note: Figures in brackets indicate percentage to total plan outlay. | | |

(Source : https://www.niti.gov.in/)

सहाव्या योजनेत सामाजिक सेवांवर १४०.३५ कोटी रु. इतका खर्च करण्यात आला. एकूण खर्चाच्या १४.४ % इतका राहिला. सातव्या योजनेत ३१५.४५ (१७.५%) कोटी रु. इतका खर्च करण्यात आला. आठव्या योजनेत या खर्चात वाढ होऊन तो ७९०.१२ कोटी रु. करण्यात आला. नवव्या योजनेत १८३२.७३ कोटी रु. दहाव्या योजनेत ३४७३.९१ कोटी रु. अकराव्या योजनेत ११०२३.२७ कोटी रु. तर बाराव्या योजनेत २६६४८.४३ कोटी रु.

१९८१-८५ या सहाव्या योजना काळात सामाजिक सेवांवर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण १४.४ % इतके होते तेच बाराव्या योजनेत (२०१२-१७) दुप्पट पेक्षा जास्त ३४.७ % इतके वाढले आहे.

**योजना काळातील सामाजिक सुविधांवर झालेल्या खर्चाचे वितरण**

| योजना | शिक्षण | औषधे आणि सार्व.आरोग्य | सामाजिक सेवा |
|---|---|---|---|
| १ ली योजना | १४९ | ६५.२ | ४७२.६ |
| २ री योजना | २७३.५ | १४०.८ | ८५४.८ |
| ३ री योजना | ५८८.७ | २२५.९ | १४९१.८ |
| वार्षिक योजना | ३०६.८ | १४०.२ | ९७५.९ |
| ४ थी योजना | ७७४.३ | ३३५.५ | २९८५.२ |
| ५ वी योजना | १७१०.३ | ७६०.८ | ६८३३.९ |
| वार्षिक योजना | २६३ | २२३.१ | १९६७.५ |
| ६ वी योजना | २९७६.६ | २०२५.२ | १५९१६.६ |
| ७ वी योजना | ७६८५.५ | ३६८८.६ | ३४९४९.७ |
| वार्षिक योजना | २३१६.५ | १०४०.८ | ९६०६.६ |
| वार्षिक योजना | २५९९ | ९२४.८ | १०२९८.७ |
| ८ वी योजना | २१५९८.७ | ८१३७.६ | ८८८०६.६ |
| ९ वी योजना | ५१३४३.२ | १७३७९.७ | १७५२१४.६ |

(Source : https://www.niti.gov.in/)

भारत सरकारने सामाजिक क्षेत्राचा विकास करण्याच्या हेतूने राष्ट्रीय आरोग्य मिशन, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, शालेय पोषण आहार, प्रधान मंत्री आवास योजना, जल जीवन मिशन, इत्यादी योजना सुरू करून त्यावर खर्च केला जात आहे. त्याचा फायदा समाजातील लोकांना मिळून त्यांचा विकास साध्य होत आहे.

सामाजिक सेवांवरील खर्च २०२०-२१ मध्ये ६५.२४ लाख कोटी रु. होता यात शिक्षणावर ६.२१ लाख कोटी रु. आरोग्यावर ३.५० लाख कोटी रु. ६.६३ कोटी रु. ग्रामीण विकासावर खर्च करण्यात आले. २०२१-२२ मध्ये ७१.६१ लाख कोटी रु. यातील ६.९७ लाख कोटी रु. शिक्षणावर, ४.७२ लाख कोटी रु. आरोग्य तर ७.३७ लाख कोटी रु. ग्रामीण विकासावर खर्च करण्यात आले.

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**गाळलेल्या जागा भरा.**

(१) सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात ------------ योजनेसाठी ६०००० कोटी रु. इतकी तरतूद करण्यात आली.
(अ) मनरेगा (ब) जल जीवन मिशन (क) कुटुंब कल्याण

(२) सार्वजनिक खर्चात वाढ होण्याचे कारण म्हणजे -------होय.
(अ) कल्याणकारी योजना (ब) विकास (क) दुष्काळ

(३) भारताने -------- राज्याची संकल्पना स्वीकारली आहे.
(अ) कल्याणकारी (ब) सार्वजनिक (क) संघीय

## ५.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **योजना खर्च :** अंदाजपत्रकात ज्या खर्चाची तरतूद असते त्या खर्चास योजना खर्च असे म्हणतात.
- **पंचवार्षिक योजना :** भारत सरकारने नियोजनपूर्वक विकास करण्यासाठी नियोजन मंडळ स्थापन केले. त्यांनी पाच वर्षाच्या कालावधीसाठी योजना राबविली त्यास पंचवार्षिक योजना म्हणतात. नरेंद्र मोदी सरकारने नियोजन आयोगाच्या जागी नीती आयोगाची स्थापना केली आहे.
- **वार्षिक योजना :** पंचवार्षिक योजनेचा कालावधी संपल्यावर पुढील पंचवार्षिक योजना सुरू होण्यात विलंब होत असेल तर एका वर्षासाठी योजना जाहीर केली जाते त्या योजनेला वार्षिक योजना असे म्हणतात.

## ५.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) (ब) जल जीवन मिशन
(२) (अ) कल्याणकारी योजना
(३) (क) कल्याणकारी

## ५.५ सारांश

केंद्र व राज्य सरकारे सार्वजनिक सेवांच्या माध्यमातून आपला खर्च वाढवत असल्याचे दिसून येते. कल्याणकारी योजनाची आखणी व अंमलबजावणी अशा मार्गाने सार्वजनिक सेवांचा विस्तार होत आहे. ग्रामीण विकास, आरोग्य, शिक्षण, अन्नधान्य, इत्यादी बाबीचा दर्जा अजूनही खालावलेला दिसून येतो. कोविड १९ च्या काळात यातील बऱ्याच बाबींचा अनुभव आपण सर्वांनी घेतला. सार्वजनिक सेवांवरील खर्च जरी वाढत असलेला दिसून येत असला तरी अजून त्यामध्ये सातत्यपूर्ण वाढ करण्याची गरज आहे.

## ५.६ सरावासाठी स्वाध्याय

(१) सरकारमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनाचा आढावा घ्या?
(२) सार्वजनिक खर्च वाढत असूनही सेवा-सुविधांचा दर्जा व संख्या अजूनही कमी आहे? कारणे शोध व लिहा?

## ५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) ओझरकर सु. रा., *राजस्व,* नागपूर, विद्या प्रकाशन

(२) दातीर, कदम, लोमटे, चिंतामणी, *सार्वजनिक आय-व्यय,* पुणे, निराली प्रकाशन

(३) उशीर, जावळे, सय्यद, आढाव, *सार्वजनिक आय-व्यय,* पुणे, निराली प्रकाशन

(४) प्रतियोगिता दर्पण, *भारतीय अर्थव्यवस्था,* आग्रा

(५) दत्त आणि सुंदरम, *भारतीय अर्थव्यवस्था,* दिल्ली, एस. चंद पब्लिकेशन

(६) जे. एफ. पाटील, *सार्वजनिक अर्थकारण,* कोल्हापूर, फडके प्रकाशन

(७) www.indiabudget.gov.in

(८) www.mahakosh.maharashtra.gov.in

(९) https://www.niti.gov.in/

# घटक ६ : अनुदान, सरकारकडून व्याज भरणा

*अनुक्रमणिका*


६.० उद्दिष्टे

६.१ प्रास्ताविक

६.२ विषय-विवेचन

६.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

६.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

६.५ सारांश

६.६ सरावासाठी स्वाध्याय

६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ६.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

- अनुदाने व व्याज या संकल्पना व त्यांची व्याप्ती तपासणे.
- अनुदाने व व्याज यावरील खर्चाची प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

## ६.१ प्रास्ताविक

केंद्र सरकार प्रादेशिक सरकारांना व प्रादेशिक सरकारे स्थानिक सत्तांना अनुदाने देतात. हि अनुदाने सामान्य व विशेष अशा दोन्ही प्रकारची असतात. विशेष अनुदाने हि विशिष्ट कार्याकरिता दिली जातात तर सामाजिक सोयी सुविधा, वेतन, भत्ते, इत्यादी अनेक उद्दिष्टे विचारात घेऊन अनुदाने दिली जातात. कल्याणकारी राज्याच्या संकल्पना स्विकारल्याने अनुदानाच्या रकमेत मोठी वाढ होत असल्याचे दिसून येते. त्याचा परिमाण सरकारला कर्जे घ्यावी लागतात. अशा कर्जांची परतफेड करण्यसाठी व व्याजाची रक्कम अदा करण्यसाठी पुन्हा कर्जे घ्यावी लागतात. काही वर्षात असे होत असेल तर विकासाच्या प्राथमिक टप्यात यात काही वावगे नाही; परंतु पुनःपुन्हा असे होत राहणी आर्थिक विकासासाठी धोकादायक आहे.

# ६.२ विषय-विवेचन

## (१) अनुदाने

### व्याख्या

अनुदाने म्हणजे एखांदा उद्योग बंद पडू नये म्हणून त्याला केलेली आर्थिक मदत होय किंवा सेवा लोकांना स्वस्त किमतीला मिळाव्या यासाठी सरकारने उत्पादकाला दिलेली भरपाई होय.

वेगवेगळ्या प्रकारची अनुदाने देऊन सरकार आपल्याजवळील पैसा समाजासाठी खर्च करतात.

या अनुदानांचे तीन प्रकार पडतात.

### (अ) प्रमाणबद्ध अनुदाने

व्यक्तीच्या उत्पन्नाचा आकार विचारात न घेता जेव्हा सरसकट सर्व व्यक्तींना विशिष्ट प्रमाणात अनुदान दिले जाते तेव्हा त्यास प्रमाणशीर अनुदाने असे म्हणतात. या प्रकारच्या अनुदानांमुळे संपत्तीतील आर्थिक विषमता कमी होऊ शकत नाही. अशा अनुदानांमुळे विषमतेत वाढ होते. उदाहरणार्थ, पगारच्या १० टक्के घरभाडे अनुदान दिले तर जास्त पगार असणाऱ्याला जास्त लाभ मिळेल व कमी पगार असणाऱ्याला अत्यल्प फायदा होईल. खरे तर कमी पगार असणाऱ्या व्यक्तीला अधिक अनुदानाची गरज आहे.

### (आ) पुरोगामी अनुदाने

प्रगतीशील किंवा पुरोगामी अनुदाने म्हणजे जितके उत्पन्न कमी तितका अनुदानाचा लाभ अधिक.

पुरोगामी अनुदानांचा पहिला प्रकार म्हणजे मौद्रिक अनुदाने होय. वृद्धापकाळ वेतन, निराधार व अंपग वेतन, बेकारी भत्ता, हि सर्व मौद्रिक व प्रगतीशील अनुदाने आहेत.

पुरोगामी अनुदानाचा दुसरा प्रकार म्हणजे विनामुल्य किंवा अल्प किमतीला वस्तू व सेवा पुरविणे. यात स्वस्त धान्य, मोफत शिक्षण, खते, औषधे, इत्यादी यामुळेही गरीब वर्गातील वापराच्या वस्तू त्यांना मोफत किवा स्वस्त मिळाल्याने त्याच्या गरजा पूर्ण होतात.

### (इ) प्रतिगामी अनुदाने

जेव्हा व्यक्तीचे उत्पन्न कमी असल्याने त्याला मिळणारी अनुदानाची रक्कमही कमी राहते तेव्हा त्यास प्रतिगामी अनुदाने म्हणतात. या अनुदानामुळे आर्थिक विषमता कमी न होता वाढत जाते. भारतीय राज्यघटनेच्या ७ व्या सूचीमध्ये राज्य सरकारची कामे आणि जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या आहे. राज्य सरकारांवर कृषी, सहकार व ग्रामीण विकासाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. तसेच शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा, राज्यांतर्गत शांतता व सुव्यवस्था यासारख्या सामाजिक जबाबदाऱ्या सोपविण्यात आलेल्या आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर राज्य जबाबदाऱ्या पार पडण्यासाठी राज्यांना कर व इतर मार्गाने मिळणारे उत्पन्न अपुरे पडते. त्यासाठी वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यांना केंद्र सरकारकडून अनुदाने देण्याची तरतूद आहे. राज्यांच्या अर्थसंकल्पातील तुट कमी करणे, राज्य-राज्यातील उत्पन्नातील तफावत दूर करणे, शिक्षणाचा दर्जा सुधारणे, प्रशासनाचा दर्जा सुधारणे यासाठी भारतीय घटनेच्या २७५ व्या कलमानुसार केंद्र सरकार राज्यांना अनुदानाचे वाटप करू शकते. पहिल्या वित्त आयोगाने सात घटकराज्यांच्या अंदाजपत्रकातील तुट भरून काढण्यासाठी, तर आठ राज्यांना प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी अनुदान देण्याची शिफारस केली होती. दुसऱ्या वित्त आयोगाने विकास साध्य करण्यासाठी अनुदान देण्याची शिफारस केली होती. तिसऱ्या वित्त आयोगाने महाराष्ट्र राज्य वगळून इतर राज्यांना महसुली खर्च भागविण्यासाठी ५५० कोटी रु. व दळणवळन सुधारण्यासाठी ४५ कोटी रु. अनुदानाची शिफारस केली होती. चौथ्या वित्त आयोगाने १९६६ ते १९७१ या कालावधीत राज्यांची तुट भरून काढण्यसाठी ४५ कोटी रु. अनुदान देण्याची शिफारस केली होती. नवव्या वित्त आयोगाने १९९० ते १९९५ या कालावधीत नियोजित व अनियोजित खर्च भागविण्यासाठी राज्यांना १५०१७ कोटी रु. व आपत्ती निवारणासाठी प्रतिवर्षी ६०३ कोटी रु. विशेष अनुदान देण्याची शिफारस केली होती. भोपाल वायुगळतीतील लोकांच्या पुनर्वसणासाठी १२२ कोटी रु. मदत करण्याची शिफारस केली होती. दहाव्या वित्त आयोगाने १९९५ ते २००० या कालावधीत महसुली तुट भरून काढण्यासाठी ७५८० कोटी रु. तसेच पोलीसदल, कारागृह, मुलींचे शिक्षण, प्राथमिक शाळेतील पिण्याच्या पाण्याची सोय करणे यासाठी १३६० कोटी रु. विशेष अनुदान याशिवाय विशेष कार्यक्रमांची

अंमलबजावणी करण्यसाठी रु. १२५० कोटी,आपत्ती व्यवस्थापन निधी यासाठी रु. ४७३० कोटी, आणि पंचायत राज्य व्यवस्था सुधारण्यासाठी रु. ५३८० कोटी इतक्या अनुदानाची शिफारस केली होती. एकूण खर्चाच्या ८% रक्कम अनुदानांवर खर्च होते.

**खालील बाबीवर अनुदाने दिली जातात.**

(१) अन्नधान्य

(२) खते

(३) पेट्रोलियम

(४) व्याज

(५) संशोधन व विकास कामे

(६) अन्नधान्याचे साठे

(७) किंमत स्थिरीकरण निधी

(८) साखर कारखाने अनुदान

(९) कर्जमाफी, इत्यादी

२०२० -२१ या वर्षात ७५८१६५.३४ कोटी रु. इतके अनुदाने देण्यात आली. २०२१ -२२ च्या सुधारित आकडेवारीनुसार ४८७८७१.८२ कोटी रु. इतकी अनुदाने देण्यात आली. तर २०२२-२३ अंदाजपत्रकात ३५५६३८.६१ कोटी रु. इतकी अनुदानाची रक्कम खर्च होणार आहे.

## व्याज

सरकारे आर्थिक व सामाजिक विकास साध्य करण्यासाठी कर्ज घेत असतात. सर्वच कर्जे हि निशुल्क नसतात. कर्जाच्या रकमेच्या बदल्यात धनकोला द्यावी लागणारी अधिकची रक्कम म्हणजे व्याज होय. कर्जाची परतफेड करत असतांना मुद्दल रक्कम आणि व्याज अशा दोन्ही रकमा परतफेड कराव्या लागतात. त्यामुळे देशावरील कर्जाची रक्कम आणि पर्यायाने व्याजाचीही रक्कम वाढत चालली आहे.

सार्वजनिक कर्जात २०००-०१ ते २००९-१० या कालावधीत वार्षिक १२.४% वाढ झाली. त्यामुळे सरकारला या कर्जावरील व्याज भरण्यसाठी मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करावा लागत आहे. महसुली तुट भरून काढण्यासाठी घ्याव्या लागणाऱ्या कर्जाच्या रकमाही वाढत आहे. कर महसुलाच्या जवळजवळ ४८% रक्कम केवळ कर्जावरील व्याज परतफेड करण्यसाठी वापरली जाते. भारताने २०००-०१ मध्ये व्याजासाठी रु. २१५०० कोटी खर्च केले होते. तेच २००९-१० मध्ये रु. २२५५११ कोटी इतके व्याजावर खर्च झाले. म्हणजेच जवळपास दहा पटीपेक्षा अधिक वाढ झाली. त्यामुळे सरकारला पूर्वीचे कर्ज परतफेड करण्यसाठी नवीन कर्जे घ्यावी लागली. २०१४-१५ मध्ये केंद्र सरकारच्या व्याजाची रक्कम ४२७०११ किती रु. GDP च्या २.६% इतकी वाढली. २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात ती ७.३१ लाख कोटी रु. GDP च्या ३.१% इतका वाढली. सामान्यपणे केंद्र सरकार दररोज व्याजाच्या रकमेपोटी १४५० कोटी रु. खर्च करते तर अनुदानांवर दररोज ६०० कोटी रु. खर्च करते. एकूण खर्चाच्या २०% रक्कम व्याज परतफेडीवर खर्च होत आहे.

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**गाळलेल्या जागा भरा.**

(१) एकूण खर्चाच्या ------ रक्कम अनुदानांवर खर्च होते.
 (अ) ८% (ब) १५% (क) २३%

(२) अंदाजपत्रकात व्याज व अनुदाने यावरील खर्च ------ दिसून येतो.
 (अ) वाढता (ब) घटता (क) स्थिर

(३) स्पर्धेत टिकून रहावे यासाठी त्यांना देण्यात येणारी आर्थिक मदत म्हणजे ------- होय.
 (अ) अनुदान (ब) व्याज (क) नफा (ड) उत्पन्न

## ६.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **व्याज :** जी कर्जे घेतली आहे त्याबद्दल कर्ज देणाऱ्याला द्यावी लागणारी रक्कम म्हणजे व्याज होय
- **अनुदाने :** देशांतील उद्योगांचा विकास व्हावा व ते स्पर्धेत टिकून रहावे यासाठी त्यांना देण्यात येणारी आर्थिक मदत म्हणजे अनुदाने होय

## ६.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) (अ) ८%

(२) (अ) वाढता

(३) (अ) अनुदान

## ६.५ सारांश

अनुदाने व व्याजाची परतफेड या दोन बाबीवर अंदाजपत्रकात अधिकची तरतूद दिसून येते. अनुदाने उत्पादक किवा योग्य कार्यासाठी दिली गेली तर ती आर्थिक विकासाला सहाय्यक ठरते. तर व्याजाची परतफेड अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा कमी करते. व्याजाच्या रकमेवर होणारा अधिकचा खर्च हि चिंतेची बाब आहे.

## ६.६ सरावासाठी स्वाध्याय

(१) अनुदानाचे प्रकार लिहा?

(२) ज्या बाबीवर अनुदान दिले जाते त्या बाबी स्पष्ट करा?

## ६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) ओझरकर सु. रा., *राजस्व,* नागपूर, विद्या प्रकाशन

(२) दातीर, कदम, लोमटे, चिंतामणी, *सार्वजनिक आय-व्यय,* पुणे, निराली प्रकाशन

(३) उशीर, जावळे, सय्यद, आढाव, *सार्वजनिक आय-व्यय,* पुणे, निराली प्रकाशन

(४) प्रतियोगिता दर्पण, *भारतीय अर्थव्यवस्था,* आग्रा

(५) दत्त आणि सुंदरम, *भारतीय अर्थव्यवस्था,* दिल्ली, एस. चंद पब्लिकेशन

(६) जे. एफ. पाटील, सार्वजनिक अर्थकारण, कोल्हापूर, फडके प्रकाशन

(७) www.indiabudget.gov.in

(८) www.mahakosh.maharashtra.gov.in

(९) https://www.niti.gov.in/

सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)**


**ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२ २२२**
**दूरध्वनी : (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७**
**फॅक्स : (०९१) (०२५३) २२३१७१६**
**वेबसाईट :** http://ycmou.digitaluniversity.ac ● http://ycmou.ac.in